दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–११२ रविवार दि.१२ जुलै २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘मोशी डेपो : नियम गाडून उभारलेला विकास की लोकांच्या जीवावर उभारलेली व्यवस्था?’


मोशी कचरा डेपोतील दुर्घटना ही केवळ एका इमारतीच्या कोसळण्याची घटना नाही; ती आपल्या विकासाच्या मॉडेलमधील धोकादायक मानसिकतेचं प्रतीक आहे. प्रत्येक दुर्घटनेनंतर आपण ‘‘अपघात’’ हा शब्द सहज वापरतो. मात्र, जेव्हा संभाव्य धोका आधीपासून माहित असतो, संबंधित यंत्रणा सूचना देतात, नियम अस्तित्वात असतात आणि तरीही त्यांची अंमलबजावणी होत नाही, तेव्हा अशा घटनांना अपघात म्हणणे म्हणजे वास्तवापासून पळ काढण्यासारखे आहे.

# एल निनोचा फटका; देशात खरीप पेरणीत २३ टक्के, महाराष्ट्रात ३१.५ टक्के घट

## सरासरीपेक्षा ३३ टक्के कमी पावसामुळे शेतकरी प्रतीक्षेत; सोयाबीन, तूर, कापूस लागवड सर्वाधिक प्रभावित

मुंबई । प्रतिनिधी

**एल निनोच्या प्रभावामुळे देशभरातील मान्सून अद्याप अपेक्षित वेगाने सक्रिय झाला नसल्याने खरीप हंगामावर त्याचा थेट परिणाम दिसून येत आहे. देशभरात सरासरी २७ टक्के, तर महाराष्ट्रात ३३ टक्के पावसाची तूट कायम असल्याने खरीप पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणावर खोळंबल्या आहेत. परिणामी, ९ जुलैपर्यंत देशातील खरीप पेरणी क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत २३.२५ टक्के, तर महाराष्ट्रात ३१.५ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे.**



केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या क्रॉप वेदर वॉच ग्रुपच्या अहवालानुसार, येत्या काही दिवसांत मान्सून सक्रिय झाल्यास ३० जुलैपर्यंत पेरणी क्षेत्रातील तूट मोठ्या प्रमाणात भरून निघू शकते. मात्र सध्या पावसाचा दीर्घ खंड, अनियमित पर्जन्यमान आणि अनेक भागांतील कोरडी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांनी पेरणी पुढे ढकलल्याचे चित्र आहे. मागील खरीप हंगामात १ जून ते ९ जुलै २०२५ या कालावधीत देशभरात ४.४३ कोटी हेक्टर, तर महाराष्ट्रात ७१.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली होती. यंदा त्याच कालावधीत देशात केवळ ३.५१ कोटी हेक्टर, तर महाराष्ट्रात सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरच पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाच्या हंगामात सर्वाधिक फटका तेलबिया आणि कडधान्यांना बसला आहे. देशभरात सोयाबीनच्या पेरणी क्षेत्रात तब्बल ३९.६५ टक्क्यांची घट झाली असून, मध्य प्रदेशात २० टक्के आणि महाराष्ट्रात २२ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. देशातील प्रमुख सोयाबीन उत्पादक राज्यांमध्ये पेरणी कमी झाल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तेलबिया पिकांच्या एकूण पेरणीत जवळपास ४० टक्के, तर कडधान्यांच्या पेरणीत २५.८ टक्क्यांची घट झाली आहे. तूर पिकाची पेरणी सर्वाधिक ४१.९ टक्क्यांनी घसरली आहे. धानाच्या

◀◀ पान २ वर

# ठाकरे शिवसेनेचे १८ जुलैला नागपुरात रामरक्षा आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत रामरक्षा आंदोलन केल्यानंतर आता नागपुरात शिवसेना ठाकरे पक्षाकडून आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेनेने रामरक्षा आंदोलन जे सुरू केले त्याचा पहिला टप्पा मुंबईत पार पडला. दुसरा टप्पा महाराष्ट्राच्या उपराजधानीमध्ये १८ तारखेला साडेचार वाजता होईल. स्वतः शिवसेना पक्षप्रमुख, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि असंख्य आमचे मुंबईतले नेते व विदर्भातले कार्यकर्ते यात सहभागी होतील, असे राऊत म्हणाले.



संजय राऊत म्हणाले, १८ जुलैला शिवसेना पक्षप्रमुख नागपूरला रामरक्षा आंदोलनात सहभागी होतील. राम मंदिर लूट प्रकरणामध्ये देशात असंतोष आहे, आजही मुख्य आरोपी पकडले गेले नाहीत, आजही लूट सुरू आहे. स्वतःला हिंदुत्ववादी समजणाऱ्या संस्था आणि संघटनांनी पुरस्कृत केलेले डाकू आणि चोर आजही

◀◀ पान २ वर

# तुकाराम मुंढे यांच्या रडारवर आता शाळेचे उपहारगृह!

## ■ मध्यान्ह भोजनावर असणार करडी नजर

मुंबई । प्रतिनिधी

**तुकाराम मुंढेंनी आपला मोर्चा शाळांच्या उपहारगृहांकडे आणि महापालिकांच्या शाळांमध्ये मिळणाऱ्या भोजनांकडे वळवला आहे. या संदर्भातील मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबतची एफडीएची बैठक सुद्धा झाली आहे.**



अन्न आणि औषध प्रशासनाचा कारभार आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे आल्यापासून हॉटेल मालकांचे आणि भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मुंढेंच्या नेतृत्वात एफडीएने अनेक मिठाई तयार करणाऱ्या दुकानांवर, हॉटेल्सवर, दूध उत्पादकांवर धाड टाकल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण पावसाळी अधिवेशनात राज्यातील अनेक आमदारांनी मुंढेंची या खात्यातून आता कोणत्याही ठिकाणी बदली करू नये, अशी मागणी केली आहे. अशातच आता तुकाराम मुंढेंनी आपला मोर्चा शाळांच्या उपहारगृहांकडे आणि महापालिकांच्या शाळांमध्ये मिळणाऱ्या भोजनांकडे वळवला आहे. या संदर्भातील मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबतची एफडीएची बैठक सुद्धा झाली आहे. महापालिकांच्या शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या जेवणामध्ये याआधी अनेकदा अळ्या किंवा अन्य शरीराला घातक अशा गोष्टी आढळून आल्या होत्या. ज्यामुळे मोठे वाद निर्माण

◀◀ पान २ वर

# मुंबई लोकल बॉम्बस्फोट प्रकरण : सर्वोच्च न्यायालयाकडूनही आरोपींची निर्दोष मुक्तता; राज्य सरकारचे अपील फेटाळले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या उपनगरीय लोकल रेल्वेमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देत सर्व आरोपींच्या निर्दोष मुक्ततेवर शिक्कामोर्तब केले आहे. राज्य सरकारने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात दाखल केलेले अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले असून, आरोपींची सुटका कायम ठेवली आहे. मात्र, सर्वोच्च



न्यायालयाने हा निर्णय केवळ या विशिष्ट प्रकरणापुरता मर्यादित असल्याचे स्पष्ट केले. या निकालाचा वापर इतर कोणत्याही प्रकरणात न्यायनिवाड्यासाठी दाखला म्हणून करता येणार नाही, असेही

◀◀ पान २ वर

### २०९ जणांचा झाला होता मृत्यू

मुंबईतील लोकल ट्रेन्समध्ये ११ मिनिटांत पाच ठिकाणी स्फोट झाले होते. चर्चगेट ते बोरिवली स्थानकांदरम्यान हे स्फोट झाले होते. या स्फोटांसाठी कुकर बॉम्बचा वापर करण्यात होता. ११ जुलै २००६ रोजी ११ मिनिटांत झालेल्या ७ स्फोटांनी मुंबई हादरली होती. या भिषण बॉम्बस्फोटात एकूण २०९ जणांचा झाला होता मृत्यू झाला होता तर ८०० हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले होते.

# जामिनाला विरोध, पण खटल्यांना विलंब सर्वोच्च न्यायालयाचे महाराष्ट्र सरकारवर ताशेरे

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जामीन अर्जांना जोरदार विरोध करणाऱ्या महाराष्ट्र सरकारने फौजदारी खटल्यांची जलद सुनावणी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलली नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान राज्य सरकारला कडक शब्दांत फटकारत, ‘‘आम्ही तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू,’’ असा इशाराही दिला.

अपहरण आणि हत्येच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या एका परदेशी नागरिकाच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना ही टिप्पणी



करण्यात आली. आरोपीने न्यायालयाला सांगितले की, तो गेल्या चार वर्षांपासून तुरुंगात असून त्याचे प्रकरण ट्रायल कोर्टात तब्बल ८६ वेळा सुनावणीसाठी

◀◀ पान २ वर

# पॉक्सो प्रकरणात संस्थेची प्रतिमा नव्हे, तर बालकांचे संरक्षण महत्त्वाचे

## ■ कर्नाटक उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

बंगळुरू । वृत्तसंस्था

कर्नाटक उच्च न्यायालयाने पॉक्सो प्रकरणांबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत स्पष्ट केले आहे की, बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये कोणत्याही संस्थेला अंतर्गत चौकशीच्या नावाखाली प्रकरण दडपण्याचा अधिकार नाही. शाळेतील कर्मचाऱ्यांनी कथित शोषणाची घटना लपवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेला एफआयआर न्यायालयाने

◀◀ पान २ वर

# भारतीय प्रवाशांची बोट उलटून व्हिएतनाममध्ये १५ पर्यटकांचा मृत्यू

हनोई । वृत्तसंस्था

परदेशात पर्यटनासाठी गेलेल्या भारतीय नागरिकांबाबत एक अत्यंत दुर्दैवी आणि मोठी बातमी समोर आली आहे. व्हिएतनाममधील फु क्वोक द्वीप परिसरात भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक स्पीडबोट समुद्रात उलटली. या भीषण



अपघातात १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओशन पियर आइलैंड कंपनीची एक स्पीडबोट पर्यटकांना घेऊन होन में रुटवरून एन थोई पोर्टकडे जात

◀◀ पान २ वर

# अजित पवारांच्या आठवणीत धनंजय मुंडे भावूक!

## ■ यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा घेतला निर्णय



मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्र अजूनही या धक्क्यातून सावरलेला नाही. अशातच, त्यांचे अत्यंत विश्वासू सहकारी आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी एक अत्यंत संवेदनशील आणि मोठा निर्णय घेतला आहे.**


**आपला आगामी वाढदिवस कोणत्याही प्रकारचा जल्लोष न करता, पूर्णपणे साधेपणाने आणि सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्याचे आवाहन धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार आणि धनंजय मुंडे यांचे सलोख्याचे व घट्ट राजकीय संबंध नेहमीच चर्चेत राहिले आहेत. बारामती येथील दुर्दैवी विमान अपघातात अजित पवारांचे अकाली निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला. विकासाची तीव्र ओढ असलेला आणि प्रशासनावर प्रचंड पकड असलेला एक खंबीर नेता गमावल्यामुळे राज्याचे कधीही न भरून निघणारे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत रात्रंदिवस त्यांच्यासोबत सावलीसारखे वावरणारे धनंजय मुंडे यांचा वाढदिवस जवळ

◀◀ पान २ वर

### वाढदिवस समाजसेवेत दिसू द्या...

वाढदिवस साजरा करण्याऐजी माझ्यावरील आपल्या प्रेमाचे रूप समाजसेवेत दिसू द्या, असे आवाहन करत त्यांनी कार्यकर्त्यांना सामाजिक उपक्रम राबवण्यास सांगितले आहे. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, तसेच आपल्या गावातील किंवा प्रभागातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावावा. याचसोबत अडचणीत असलेल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे आणि ज्ञानदान हीच सर्वात मोठी सेवा असल्याने स्थानिक वाचनालयांना पुस्तके भेट द्यावीत. एखाद्या गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



# राज्यात पावसाची पाच दिवस विश्रांती राहणार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात पावसाचा जोर ओसरल्याने मागील दोन दिवसांपासून उघडीप पाहायला मिळत आहे. तसेच उन्हाचा चटका वाढला असून, ऊन सावल्यांचा खेळही अनुभवायला मिळत आहे. राज्यात पावसाची उघडीप राहणार असून तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. दरम्यान, बहुतांश भागात अजूनही दमदार पावसाची शेतकरी प्रतिक्षा करत आहेत.**

रविवारी राज्यात पावसाची उघडीप राहण्याची शक्यता असून सोमवारी पूर्व विदर्भात विजा आणि वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### भारत जागतिक विकासाचा ‘लाँचपॅड’–पंतप्रधान मोदी

ऑकलंडः भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार करार झाल्यानंतर दोन्ही देशांनी आर्थिक आणि सामरिक संबंधांना नवी दिशा देणारा २०३० पर्यंतचा महत्त्वाकांक्षी रोडमॅप जाहीर केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्यूझीलंडमधील उद्योगजगताला भारतात गुंतवणुकीचे आवाहन करत, ‘‘भारत ही केवळ बाजारपेठ नसून जागतिक विकासासाठीचे लाँचपॅड आहे,’’ असे ठामपणे सांगितले. न्यूझीलंड दौऱ्या दरम्यान आयोजित ‘इंडिया–न्यूझीलंड बिझनेस अँड स्पोर्ट्स एंगेजमेंट’ कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, अवघ्या नऊ महिन्यांत पूर्ण झालेला मुक्त व्यापार करार व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, सेवा क्षेत्र आणि कुशल मनुष्यबळाच्या देवाणघेवाणीसाठी नवे मार्ग खुले करेल. पंतप्रधानांनी २०३० पर्यंत भारत–न्यूझीलंडमधील द्विपक्षीय व्यापार दुप्पट होईल, असा विश्वास व्यक्त केला.

### ॲक्युपंक्चरसाठी राज्य शासन प्रयत्नशील–मुख्यमंत्री

मुंबई : ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीतून असंख्य रूग्णांना आपल्या व्याधीपासून मुक्त होण्यास मदत झाली आहे. तेवीस–चोवीस वर्षांपूर्वी मी स्वतः पाठदुखीने त्रस्त असताना या उपचार पद्धतीने मला तंदुरुस्त होता आले. या ज्ञानशाखेच्या विस्तारासाठी व याचे शैक्षणिक मार्ग वृद्धींगत व्हावेत, या दृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील असून शासकीय पातळीवर कोठेही कमतरता पडणार नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲक्युपंक्चर ॲक्यूकॉन २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी महाराष्ट्र काऊन्सील ऑफ ॲक्युपंक्चरचे डॉ. रूमी बेरामजी, इंडियन सोसायटी ऑफ मेडिकल अक्युपंक्चर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमण कपूर यांच्यासह डॉ. नारायण नवले आणि डॉ. प्रदीप गुहा आदि मान्यवर उपस्थित होते.

### तुरुंगातून आलेल्या आरोपीकडून ६ खून

रंगा रेड्डी : लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तुरुंगवास भोगून आलेल्या एका तरुणाने एकाच रात्रीत तब्बल सहा जणांची हत्या केली आहे. त्याने पीडित मुलीला देखील गळा चिरून संपवले आहे. या रक्तरंजित थराराने संपूर्ण देश हादरला आहे. ही घटना तेलंगणातील रंगा रेड्डी जिल्ह्यात घडली असून राजकुमार असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरोधात १७ वर्षीय मुलीने लैंगिक अत्याचाराची तक्रार नोंदवली होती. मुलगी अल्पवयीन असल्याने पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. अटकेनंतर आरोपीला न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला. आरोपी राजकुमारने शुक्रवारी रात्री धारदार शस्त्राने पीडित मुलगी, तिची आई आणि आजीवर हल्ला करून त्यांची हत्या केली. त्यानंतर घरी येऊन त्याने पत्नी सरिता आणि आपल्या दोन चिमुकल्या मुलांची हत्या केली. पोलिस घटनास्थळी पोहोचेपर्यंत आरोपी फरार झाला होता.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.११ जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६३.०० क्विंटल | २,४४० | २,८४१ | २,६६४ |
| ज्वारी/हायब्रिड: १७१.०० क्विंटल | २,३०० | ४,१०० | २,९९३ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १६४.५० क्विंटल | २,४०० | ३,५११ | २,७९३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,०३१ | ६,०३१ | ६,०३१ |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,५९० | ६,१०० | ५,७९६ |

## अग्रलेख

# ‘मोशी डेपो : नियम गाडून उभारलेला विकास की लोकांच्या जीवावर उभारलेली व्यवस्था?’

मोशी कचरा डेपोतील दुर्घटना ही केवळ एका इमारतीच्या कोसळण्याची घटना नाही; ती आपल्या विकासाच्या मॉडेलमधील धोकादायक मानसिकतेचं प्रतीक आहे. प्रत्येक दुर्घटनेनंतर आपण ‘‘अपघात’’ हा शब्द सहज वापरतो. मात्र, जेव्हा संभाव्य धोका आधीपासून माहित असतो, संबंधित यंत्रणा सूचना देतात, नियम अस्तित्वात असतात आणि तरीही त्यांची अंमलबजावणी होत नाही, तेव्हा अशा घटनांना अपघात म्हणणे म्हणजे वास्तवापासून पळ काढण्यासारखे आहे.

मोशी डेपोबाबत समोर आलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला अनेक बाबींवर नोटिसा देत उपाययोजना सुचवल्या होत्या. घनकचरा व्यवस्थापन, बायो–मायनिंग, मिथेन वायूचे व्यवस्थापन आणि सुरक्षाविषयक बाबींकडे लक्ष वेधण्यात आले होते. या सूचनांवर कितपत अंमलबजावणी झाली, हा तपासाचा विषय आहे. पण एक प्रश्न मात्र आजच विचारला पाहिजेधोक्याची जाणीव असतानाही संबंधित ठिकाणी इमारत उभारण्याचा निर्णय का घेण्यात आला? भारतातील विकासाची शोकांतिका अशी आहे की, नियम हे अनेकदा केवळ कागदांपुरतेच राहतात. प्रकल्पांची उद्घाटने मोठ्या उत्साहात होतात, पण सुरक्षा, गुणवत्ता आणि दीर्घकालीन परिणाम यांचा विचार दुय्यम ठरतो. विकासाच्या घोषणांमध्ये ‘‘स्मार्ट सिटी’’, ‘‘शाश्वत विकास’’ आणि ‘‘आधुनिक पायाभूत सुविधा’’ यांची भाषा असते; प्रत्यक्षात मात्र नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याला अधिक महत्त्व दिले जाते. मोशीची घटना या व्यवस्थेतील एकटी नाही. बिहारमध्ये काही आठवड्यांत अनेक पूल कोसळले. गुजरातमधील मोरबी पूल दुर्घटनेत शेकडो नागरिकांचे प्राण गेले. मुंबईतील अवाढव्य होर्डिंग कोसळून निष्पाप लोकांचा मृत्यू झाला. पुण्यातील कल्याणीनगर अपघाताने कायद्याच्या अंमलबजावणीतील असमानता उघड केली. प्रत्येक घटनेनंतर चौकशी समित्या बसतात, जबाबदारी निश्चित करण्याची घोषणा होते, काही अधिकाऱ्यांची बदली होते; पण व्यवस्थेच्या कार्यपद्धतीत बदल होतो का? हा प्रश्न कायम अनुत्तरित राहतो. मोशी डेपोच्या प्रकरणात लोकप्रतिनिधींची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. लोकप्रतिनिधींचे काम केवळ भूमिपूजन करणे किंवा उद्घाटनाच्या फिती कापणे नाही. सार्वजनिक प्रकल्पांवर देखरेख ठेवणे, नियमांचे पालन होत आहे का याची खात्री करणे आणि प्रशासनाला जाब विचारणे ही त्यांची घटनात्मक जबाबदारी आहे. जर संबंधित विभागांना संभाव्य धोके माहिती होते, तर स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यावर सार्वजनिक भूमिका का घेतली नाही? नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न हा राजकारणापेक्षा मोठा असतो. यापेक्षाही चिंतेची बाब म्हणजे भारतात उत्तरदायित्वाची व्याख्या बदलताना दिसते. दुर्घटना होईपर्यंत कोणालाही जबाबदार धरले जात नाही आणि दुर्घटना घडल्यानंतर जबाबदारी इतक्या स्तरांवर विभागली जाते की, शेवटी दोष निश्चितच होत नाही. परिणामी, प्रत्येक दुर्घटना पुढील दुर्घटनेचं निमंत्रण बनते. आज देशात हजारो कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहेत. पण या प्रकल्पांचे यश केवळ त्यांच्या खर्चावर किंवा आकारावर मोजले जाणार नाही. त्यांचे मूल्यांकन नागरिकांच्या सुरक्षिततेवर होईल. कारण विकासाचा अर्थ फक्त उंच इमारती, रुंद रस्ते आणि आकर्षक प्रकल्प नसतो; विकासाचा अर्थ असा समाज उभा करणे, जिथे नागरिकांना त्यांच्या जीवाची भीती वाटणार नाही. मोशी डेपो प्रकरणात अंतिम निष्कर्ष तपासातूनच समोर येतील. दोष कोणाचा आहे, हे सक्षम यंत्रणांनीच ठरवायचे आहे. परंतु या घटनेने उपस्थित केलेले प्रश्न टाळून चालणार नाहीत. नियम मोडले गेले का? जर गेले असतील, तर त्याला परवानगी कोणी दिली? देखरेख कोणी केली? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या दुर्घटनेतून व्यवस्था काही शिकणार आहे का? कारण लोकशाहीत नागरिकांचा सरकारवरचा विश्वास हा घोषणांवर नव्हे, तर उत्तरदायित्वावर टिकून असतो. आणि जेव्हा नियम गाडून विकास उभा राहतो, तेव्हा सर्वप्रथम ढासळते ती इमारत नव्हेतर लोकांचा व्यवस्थेवरील विश्वास.

# बीडमध्ये संत मुक्ताबाई पालखीचे भक्तिमय स्वागत
## भाजपच्या वतीने नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी घेतले दर्शन

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र पंढरपूर कडे प्रति वर्ष प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या व भक्तीमय वातावरणामध्ये गेल्या १७ दिवसापासून श्री मुक्ताईनगर ते श्रीक्षेत्र पंढरपूर श्री संत मुक्ताबाई यांची पालखी निघालेली आहे त्या पालखीचा मुक्काम आज बीड शहरामध्ये आहे या अनुषंगाने श्री संत मुक्ताबाई यांचे बीड शहरांमध्ये मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या भक्तीमय वातावरणामध्ये मोठ्या जल्लोषात आगमन झाले आसता लगेच क्षणाचा विलंब न करता देव देश धर्म यासाठी सातत्याने समाजसेवेचे कार्य करणारे व सातत्याने समाजसेवेच्या कार्यामध्ये अग्रेसर असलेले तथा भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने मनोभावे श्री संत मुक्ताबाई यांची मानस पूजा करून श्री संत मुक्ताबाई यांना पुष्पहार अर्पण केला व नंतर श्री संत मुक्ताबाई यांच्या चरणी मंगलमय प्रार्थना केली की सर्व लोक सुखी सर्वत्र चांगल्या प्रकारे समाधानाने नांदावेत व सर्वत्र



चांगल्या प्रकारे पाऊस पडावा व सर्व लोक सुखी व्हावेत व सर्वत्र पीक चांगल्या यावेत शेतकऱ्याला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळावे अशी भक्तयुक्त मंगलमय प्रार्थना ही श्री संत मुक्ताबाई यांच्या चरणी मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने केली या वेळी या वेळी उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह सामाजिक कार्यकर्ते गोविंद भांगे तसेच श्री संत मुक्ताबाई यांच्या पालखीच्या ठिकाणी दर्शनाला आलेल्या माता–भगिनीला कुठल्याही माता भगिनीला त्रास होऊ नये या साठी श्री संत मुक्ताबाई यांच्या पालखीच्या सर्व वारकऱ्यांची व येणाऱ्या जाणाऱ्या भाविक भक्ताचे सेवा करणाऱ्या नयना भाकरे मॅडम तसेच जोगदंड मॅडम या देखील उपस्थित होत्या तसेच बीड शहरातील हजारो भाविक फक्त श्री संत मुक्ताबाई यांचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते व श्री संत मुक्ताबाई यांची पालखी श्री भगवान पंढरीष पांडुरंग श्रीक्षेत्र पंढरपूरकडे श्री विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेली ही पालखी ही दोन दिवस बीड शहरांमध्ये असणार आहे म्हणून सर्व भाविक भक्तांनी शिस्तीमध्ये कुठलीही गडबड गोंधळ कुठलाही न करता व जिल्हा पोलीस प्रशासनाला सहकार्य करत श्री संत मुक्ताबाई यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा व आपल्या जीवनाचे कल्याण करून घ्यावे व श्री संत मुक्ताबाई यांचा दिव्य आशीर्वाद घ्यावेत असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मा राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना ते सातत्याने देव देश धर्म या यासाठी कार्यरत असलेले व त्या माध्यमातून करत असलेल्या समाजसेवेच्या ब्रीदवाक्य च्या अनुषंगाने दर्शन घेतल्यानंतर प्रसार माध्यमासी काही क्षण त्यांनी बोलताना सांगितले की सर्वांनी श्री संत मुक्ताबाई यांचे दर्शन घ्यावे या दर्शनाचा खूप मोठा सर्वांना लाभ होतो हा अनुभव आम्हाला प्रत्येकाला आलेला आहे कारण जे आपले देव करू शकत नाहीत ते श्री संत करू शकतात कारण एक ठिकाणी श्री संतांनी सांगितले आहे मस्तक हे पायावरी श्री वारकरी संतांचीया विश्रांती पावलो आता सांभाळावे उत्तरी या न्यायाप्रमाणे व श्री संतांच्या वचनाप्रमाणे प्रत्येकाने श्री संत मुक्ताबाई यांचे दर्शन घेणे गरजेचे आहे असे आपले उत्कृष्ट अभ्यासपूर्वक उत्कृष्ट मनोगत व्यक्त करून प्रसार माध्यमासी थोडक्यात बोलताना मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी सांगितले आहे .

# आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश
## बीड एसटी आगाराच्या ताफ्यात ५ अत्याधुनिक ‘राजमाता जिजाऊ’ बसेस दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**बीड मतदारसंघातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी आणि एसटीचा प्रवास अधिक गतिमान करण्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला श यश आले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या () वतीने बीड आगारासाठी अत्यंत आधुनिक आणि हाय–टेक अशा ५ नवीन ’राजमाता जिजाऊ’ बसेस मंजूर करण्यात आल्या असून, त्या बसेस बीड आगारात दाखल झाल्या आहेत. अधिक आसन क्षमता आणि कडक सुरक्षा यंत्रणा असलेल्या या नव्या बसेसमुळे जिल्ह्यातील प्रवासी वाहतुकीचा चेहरामोहरा बदलणार आहे.**

बीड जिल्ह्यातील मुख्य आणि ग्रामीण मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. अनेकदा बसमध्ये जागा न मिळाल्याने प्रवाशांना उभे राहून किंवा ताटकळत प्रवास करावा लागत होता. प्रवाशांची हीच अडचण ओळखून आमदार संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्रालयाकडे बीड आगाराला नवीन बसेस देण्याबाबत सातत्याने मागणी केली होती. अखेर त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून ५ नव्या दमाच्या ’राजमाता जिजाऊ’ बसेस बीडकरांच्या सेवेत रुजू झाल्या आहेत. त्यामुळे गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. ’राजमाता जिजाऊ’ बसेसमध्ये अत्याधुनिक ३ बाय २ ची आसन रचना करण्यात आलेली आहे. यामुळे बसची एकूण क्षमता ५५ ते ५६ आसनांची झाली असून, नेहमीच्या बसपेक्षा यामध्ये १५ ते १६ आसने जास्त आहेत. परिणामी, प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागणार नाही. तसेच प्रवाशांच्या आणि विशेषत: महिलांच्या सुरक्षेसाठी बसच्या आत आणि बाहेर ४ हाय–डेफिनिशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत व बसमध्ये रिअल–टाईम ट्रॅकिंगसाठी जीपीएस () यंत्रणा आणि पुढील स्थानकाची माहिती देणारा इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक (स्मार्ट डॅशबोर्ड) लावण्यात आलेला आहे. त्यासोबतच प्रवासात कोणतीही आणीबाणीची परिस्थिती किंवा दुर्घटना घडल्यास प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ’पॅनिक बटण’ आणि अलार्म सिस्टीम देण्यात आली असून प्रवाशांना आवश्यक सूचना देण्यासाठी बसमध्ये अनाउन्समेंट सिस्टीमची विशेष सोय आहे. आणि सर्वात विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेचा सन्मान राखत या बसेस आकर्षक भगव्या आणि पांढऱ्या रंगात डिझाइन करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान महाराष्ट्राच्या आराध्य परंपरेचे प्रतीक असलेल्या आणि हाय–टेक तंत्रज्ञानाने सज्ज ’राजमाता जिजाऊ’ बसेस बीड आगारात दाखल होताच एसटी कर्मचाऱ्यांनी आणि नागरिकांनी मोठा आनंद व्यक्त केला आहे. सर्वसामान्यांच्या हक्काची वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास थकवामुक्त करण्यासाठी हे महत्वाचे पाऊल असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांचे सर्वसामान्य जनतेतून आभार मानले जात आहेत.

# पुण्यतिथीचे औचित्य साधत ऐतिहासिक निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी!

* बीड नगरपरिषद इमारतीच्या दर्शनी भागात प्रथम नगराध्यक्ष स्व. द्वारकादासजी मंत्री यांच्या पुतळा उभारणीचे भूमिपूजन उत्साहात
* आ. विजयसिंहजी पंडित यांच्या हस्ते भूमिपूजन; शहराच्या विकासाला दिशा देणाऱ्या नेतृत्वाला कायमस्वरूपी मानवंदना!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपरिषदेचे प्रथम नगराध्यक्ष, माजी खासदार तथा बीड शहराच्या विकासाचा भक्कम पाया रचणारे स्वर्गीय द्वारकादासजी मंत्री साहेब यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत आज बीड नगरपरिषद इमारतीच्या दर्शनी भागात त्यांच्या भव्य पुतळा उभारणीच्या कामाचे भूमिपूजन अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाले. हा सोहळा बीड शहराच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि स्मरणीय टप्पा ठरला.**

विशेष म्हणजे, बीड नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक अमर मरुतीराव नाईकवाडे यांनी स्व. द्वारकादासजी मंत्री साहेबांचा पुतळा नगरपरिषद इमारतीच्या दर्शनी भागात सन्मानाच्या स्थानावर उभारण्याचा ठराव मांडला होता. सभागृहाने हा ठराव मंजूर केल्यानंतर त्यानुसार आज आमदार विजय सिंह जी पंडित यांच्या मार्गदर्शनात प्रत्यक्ष भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यामुळे त्या ऐतिहासिक निर्णयाच्या अंमलबजावणीला प्रारंभ करण्यात आला. त्यामुळे नगरपरिषदेने स्व. मंत्री साहेबांच्या कार्याचा योग्य सन्मान करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दीर्घकाळ नगरपरिषद इमारतीबाहेरील रस्त्यालगत असलेला स्व. द्वारकादासजी मंत्री साहेबांचा पुतळा आता नगरपरिषद इमारतीच्या दर्शनी भागात सन्मानाच्या स्थानावर उभारला जाणार आहे. त्यांच्या कार्याला योग्य तो मान मिळावा आणि भावी पिढ्यांना त्यांच्या योगदानाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा ऐतिहासिक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या पवित्र सोहळ्याचे भूमिपूजन आमदार मा. विजयसिंहजी पंडित यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मा. श्री. संतोषजी सोहनी हे होते. यावेळी श्री. राजेंद्रजी जगताप, श्री. सुनील दादा धांडे, श्रीमती उषाताई दराडे, श्रीमती सुशिलाताई मोराळे, श्री. सत्यनारायणजी लाहोटी, सी.ए. एस. पी. लड्डा साहेब, श्री. हनुमानदासजी मंत्री यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच श्री. विनोदजी मुळूक, गटनेते फारुकजी पटेल, श्री. बाळासाहेब गुंजाळ, श्री. संजयजी उडाण, शेख निजाम, सौ. आरती रंजीत बनसोडे, अश्फाक इनामदार, भीमराव वाघचौरे, रामदास सरवदे, मनोज गोडसे, किशोरजी काळे यांच्यासह अनेक मान्यवर, नगरपरिषद सदस्य, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मानसिक आजारांची लक्षणे–डॉ.जगदीश टेकाळे

**व्यसनाधिनता: दारुचे व्यसन, तंबाकु गुटखा सेवन, धुम्रपान, चरस गांजा सेवन, सायकोसिस : वेडसरपणाचा झटका येणे, सतत शंका व्यक्त करणे, कानात आवाजाचे भास होणे, एकांतात बडबड करणे, हसणे स्वभावात व प्रकृतीत बदल होणे, सतत भटकत राहणे, आंघोळ न करणे, बंद खोलीत / अंधारात स्वत:ला कोंडून घेणे. ड्रिपेशन: मन उदास राहणे, आत्मविश्वास कमी होणे, कामात / अभ्यासात / संसारात मन न लागणे, आत्महत्येचे विचार मनात येणे, सतत रडू येणे, स्वत:ला कमी लेखणे, अपमानास्पद वाटणे.**



चिंता सतत टेन्शन, घाबरटपणा, छातीत धडधडणे, घाम सुटणे, थरकाप होणे, हाता पायात मुंग्या येणे, सततची एसिडीटी/अपचन, येण्याची भिती वाटणे, गंभीर आजार असल्याची भिती वाटणे, हातापायाचे / शरीराचे कापर होणे, भितीचा झटका येणे ( ), ची भिती वाटणे / असल्याचा संशय येणे. जुनाट डोके दुखी : अर्धे किंवा पूर्ण डोके दुखणे, ताणतणावामुळे डोके जड असणे, डोक्यात मुंग्या येणे. खुप राग येणे: चिडचीड करणे, जास्त बोलणे, अतिशय खुश राहणे, विनाकारण खर्च करणे, व्यसन सुरू करणे किंवा वाढवणे, रात्रभर जागे राहणे, मोठमोठया गप्पा मारणे, शिवीगाळ करणे, अंगावर धावून जाणे. हाता–पायामध्ये किंवा संपूर्ण शरीरामध्ये मुंग्या येणे आग पडणे, सर्व चाचण्या / तपासण्या नॉर्मल असून सततची अंगदुखी पाठदुखी असणे, सतत अंग/ पोट दुखणे, सतत अपचन होणे, सतत संडासला आणि लघवीला जाणे. लहान मुलांचे आजार : अभ्यासात लक्ष न लागणे, अभ्यास विसरणे, अतिहट्टीपणा करणे अतिचंचलपणा, कपडयात लघवी करणे मतीमंदपणा: व त्यातून होणाऱ्या वर्तणुकीच्या समस्या, ऑटिझम (स्वमग्नता), अध्ययन अक्षमता, गतिमंदपणा निद्रानाश झोप न येणे, झोप टिकून न राहणे, वारंवार झोपेतून उठणे, झोपेत चालणे/बडबड करणे/ओरडणे फिटस/मिरगी/झटके येणे, डोक्याला मार लागल्यामुळे होणाऱ्या समस्या, चक्कर येणे, बेशुध्दीचे झटके येणे, दातखिळी बसणे. स्मृतिभ्रंश : विसरभोळेपणा ठेवलेल्या वस्तू/नाव/गाव/ घरचा पत्ता विसरणे. ओ.सी.डी.(मंत्रचळ): मनात सतत एकसारखे विचार येणे, वारंवार हात धुणे/सफाई करणे, चेक्ष करणे, आकडे मोजणे, देवाबदल वाईट विचार येणे, घाणेरडे विचार येणे, सत सेक्सबद्दल विचार येणे. पुरुषांच्या लैंगिक समस्या लवकर वीर्यपतन होणे, शिश्न ताठ न होणे, छोटे असणे, नपुंसकता, स्वप्नदोष, कमजोरी, धातू जाणे / धातू रोग, स्त्रियांच्या लैंगिक समस्या, सेक्सची इच्छा न होणे. समूपदेश, दैनंदिन तणाव । परिक्षेची भिती । वैवाहिक व विवाहपूर्व समूपदेशन । व्यसन मुक्तीसाठी समुपदेशन वरील लक्षणे मानसिक आजाराची असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान १ वरून...

### एल निनोचा फटका; देशात खरीप पेरणीत

रोपवाटिका आणि लागवड क्षेत्रात १३.०७ टक्क्यांची घट झाली असून, पश्चिम बंगालमध्ये धानाचे क्षेत्र १० टक्के आणि बिहारमध्ये १५ टक्क्यांनी कमी झाले आहे. कापूस लागवडीलाही पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. आंध्र प्रदेश वगळता देशातील बहुतांश कापूस उत्पादक राज्यांमध्ये कापसाच्या लागवड क्षेत्रात सरासरी २३ टक्क्यांची घट झाली असून, त्यामुळे यंदाच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, मक्याच्या पेरणीत काही प्रमाणात दिलासादायक चित्र दिसून आले आहे. महाराष्ट्रात यंदा ५.७१ लाख हेक्टर क्षेत्रावर मक्याची पेरणी झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत हे क्षेत्र ४.५ टक्क्यांनी वाढले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा मक्याच्या पेरणीत आघाडीवर आहे. राजस्थानमध्येही ६.५० लाख हेक्टरवर मक्याची पेरणी झाली आहे, तर बाजरीच्या पेरणी क्षेत्रात तेथे ८ टक्क्यांची वाढ झाली आहे. मात्र मध्य प्रदेश, कर्नाटक आणि बिहारमध्ये मक्याच्या पेरणीत घट नोंदविण्यात आली आहे. दरवर्षी साधारणत: ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापणारा मान्सून यंदा ९ जुलैला देशभर पोहोचला. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त केला असून, तसे झाल्यास जुलैअखेरपर्यंत रखडलेल्या पेरण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण होतील आणि पेरणी क्षेत्रातील तूटही लक्षणीयरीत्या कमी होईल, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

--------------

### तुकाराम मुंढे यांच्या रडारवर आता

झाले होते. त्यामुळे आता मध्यान्ह भोजन व शाळांमधील उपाहारगृहांच्या तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासन सरसावले आहे. आता मुंबईतील खासगी शाळांमधील उपाहारगृहे तसेच मध्यान्ह भोजन पुरविणारे किचन शेड यांच्यावर एफडीएची करडी नजर असणार आहे. यासंदर्भात मुंबईत विविध ठिकाणी शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि बचत गट चालकांसोबत शुक्रवारी (१० जुलै) एक महत्त्वाची बैठक पार पडली. ज्यानंतर आता अन्न व औषध प्रशासनाने अन्न सुरक्षा मानके अधिनियम २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गतिमान कार्यवाही सुरू केली आहे.

-----------

### ठाकरे शिवसेनेचे १८ जुलैला

अयोध्येमध्ये आहेत. त्यांनी राम मंदिराची आणि रामाची पूर्ण बदनामी केल्याचा हल्लाबोल राऊत यांनी केला. तर चंद्रशेखर बावनकुळे सीएम होतील राऊत यांनी सांगितले की, ज्येष्ठ मंत्री म्हणून जर देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले, तर १०० टक्के मला असं वाटतं की चंद्रशेखर बावनकुळे यांचा विचार आणि शिफारस हे स्वतः देवेंद्र फडणवीसच करतील, हे माझं आकलन आहे. फडणवीसांनी २०२९ पूर्वी पीएम व्हावं अशीही टिप्पणी त्यांनी केली. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी येणाऱ्या योग्य व्यक्तीला नेहमी शुभेच्छा दिल्या पाहिजेत, जो राज्याचं हित पाहील, जो राज्य योग्य दिशेने पुढे घेऊन जाईल आणि जो या राज्याचा स्वाभिमान टिकवेल अशी कोणी व्यक्ती असेल तर त्याला शुभेच्छा देणं हे आमचे कर्तव्य असल्याचे ते म्हणाले.

-------------

### जामिनाला विरोध, पण खटल्यांना विलंब

सूचीबद्ध झाले. मात्र, त्यापैकी ५३ वेळा त्याला न्यायालयात हजरच करण्यात आले नाही. यावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त३ करत आरोपीला ट्रायल कोर्टासमोर वेळेवर हजर न करणे ही राज्य सरकारची गंभीर चूक असल्याचे स्पष्ट केले. खंडपीठाने नमूद केले की, ‘‘आमच्याकडे महाराष्ट्रातील अशी प्रकरणे जवळपास रोज येतात. तुम्ही जामीन अर्जांना तीव्र विरोध करता; पण खटल्यांची सुनावणी वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा उभी करत नाही. अनेक प्रकरणांत पुरावेही कमकुवत असल्याचे दिसून येते.‘‘जलद न्याय मिळणे हा आरोपीचा मूलभूत अधिकार असल्याची आठवण करून देताना न्यायालयाने पूर्वीच्या निर्णयांचा हवाला दिला. चार वर्षांच्या कालावधीत ३४ साक्षीदारांपैकी केवळ दोन साक्षीदारांचीच उलटतपासणी पूर्ण झाल्याचे पाहून न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. ‘‘आम्हाला स्वत:लाच लाज वाटत आहे. राज्य सरकार जामिनाला विरोध करत असेल, तर खटल्याची कार्यवाहीही वेगाने पार पडेल याची जबाबदारी त्यांचीच आहे,‘‘ असे खंडपीठाने स्पष्ट केले. राज्य सरकारच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, आता सर्व आरोपींना प्रत्येक सुनावणीच्या दिवशी ट्रायल कोर्टात हजर केले जात आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने केवळ आश्वासनांवर समाधान न मानता राज्यांनी खटल्यांच्या जलद निपटाऱ्यासाठी ठोस धोरण आखण्याची गरज अधोरेखित केली. खंडपीठाने ट्रायल कोर्टाला निर्देश देताना प्रत्येक आठवड्यात किमान चार साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. तसेच, या आदेशाची नोंद संबंधित न्यायालयात ठेवण्याचे निर्देश देत, भविष्यात अशा प्रकारची दिरंगाई आढळल्यास आणखी कठोर आदेश देण्याचा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला.

-----------

### मुंबई लोकल बॉम्बस्फोट

न्यायालयाने नमूद केले. या प्रकरणात महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने १३ जणांना अटक करून त्यांच्यासह एकूण २८ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. विशेष एमसीओसीए न्यायालयाने सप्टेंबर २०१५ मध्ये पाच आरोपींना फाशी, सात जणांना जन्मठेप, तर एका आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने फाशीच्या शिक्षांची अंमलबजावणी कायम ठेवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात अपील केले, तर दोषी ठरविण्यात आलेल्या आरोपींनी शिक्षेविरोधात दाद मागितली. दीर्घ न्यायालयीन सुनावणीनंतर जुलै २०२५ मध्ये न्या. अनिल एस. किलोर आणि न्या. श्याम सी. चंदाक यांच्या विशेष खंडपीठाने ६६७ पानांच्या सविस्तर निकालात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या दरम्यान, कोविड–१९ महामारीच्या काळात एका आरोपीचा तुरुंगात मृत्यू झाला होता. मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या निकालात एटीएसच्या तपास प्रक्रियेवर गंभीर ताशेरे ओढले होते. ११ आरोपींनी दिलेले कबुलीजबाब एकाच धर्तीचे असल्याने त्यांच्या विश्वासार्हतेवर न्यायालयाने गंभीर शंका व्यक्त केली. तसेच, कठोर दहशतवादविरोधी कायदा लागू करण्यासाठी आवश्यक असलेली पूर्वपरवानगी देताना राज्य सरकारकडे कोणताही ठोस आणि विश्वासार्ह पुरावा नव्हता, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले होते. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला आव्हान देत महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देत आरोपींची निर्दोष मुक्तता कायम ठेवली. त्यामुळे जवळपास दोन दशकांहून अधिक काळ चाललेल्या या गाजलेल्या दहशतवादी हल्ल्याच्या खटल्याला महत्त्वाचे न्यायालयीन वळण मिळाले आहे.

-------

### भारतीय प्रवाशांची बोट उलटून व्हिएतनाममध्ये

होती. फु क्वोक विमानतळापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या होन में रूट न्गोईजवळ अचानक ही बोट उलटली आणि सर्व प्रवासी समुद्रात फेकले गेले. या बोटीमध्ये एकूण ३६ प्रवासी प्रवास करत होते. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ज्यावेळी हा अपघात झाला, त्यावेळी समुद्रातील लाटा अत्यंत वेगवान आणि तीव्र होत्या. बोट उलटल्याचे पाहताच आसपास असलेल्या इतर पर्यटकांच्या नावा मदतीसाठी तात्काळ धावून आल्या. अवघ्या ५ मिनिटांत इतर नावांमधील चालकांनी बचावकार्य सुरू केले. मात्र, अनेक पर्यटक बोटीच्या आत अडकल्याने अडचणी आल्या. २१ जणांचे प्राण वाचवण्यात यश आले असून, २ महिला आणि १३ पुरुषांसह एकूण १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. या भीषण अपघाताची दखल घेत व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने तीव्र दु:ख व्यक्त केले असून, ते स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात आहेत. पीडित भारतीय नागरिक आणि त्यांच्या कुटुंबियांना तातडीने कॉन्सुलर मदत व माहिती मिळवून देण्यासाठी हनोई आणि हो ची मिन्ह सिटी येथे दोन विशेष कंट्रोल रूम सुरू करण्यात आले आहेत.

-------------

### पॉक्सो प्रकरणात संस्थेची प्रतिमा

कायम ठेवला आहे. न्यायालयाने म्हटले की, बाल लैंगिक अत्याचाराची माहिती मिळाल्यानंतर ती तातडीने पोलिसांना देणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. संस्थेची प्रतिष्ठा जपणे, प्रतिमा खराब होऊ नये यासाठी प्रयत्न करणे किंव३ अंतर्गत चौकशीच्या नावाखाली वेळ घालवणे हे कायद्याच्या दृष्टीने मान्य नाही. पॉक्सो कायद्यानुसार बालकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. त्यामुळे अशा घटनांची माहिती लपवणाऱ्या किंवा तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ करणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे शैक्षणिक संस्थांनी बाल संरक्षणाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचा संदेश दिला आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्थेची प्रतिमा वाचवण्यापेक्षा पीडित बालकाला न्याय आणि संरक्षण मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

------------

### राज्यात पावसाची पाच

तर उर्वरित राज्यात पावसाच्या उघडीपीचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मंगळवारी पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत हलक्या पावसाचा अंदाज असून बुधवारीही विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता आहे. उर्वरित राज्यात मात्र पावसाच्या उघडीपीचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. समुद्रसपाटीवरील मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा श्रीगंगानगर, रोहतक, शाहजहानपूर, बस्ती, मुझफ्फरपूर मार्गे मणिपूरपर्यंत सक्रिय आहे. पूर्व उत्तर प्रदेशावरील वरच्या वातावरणातील चक्राकार वाऱ्यांची स्थिती कायम असून, ती समुद्रसपाटीपासून सुमारे ५.८ किलोमीटर उंचीवर आहे. तेलंगणापासून कर्नाटक किनारपट्टीलगत पूर्व–मध्य अरबी समुद्रापर्यंत १.५ ते ३.१ किलोमीटर उंचीदरम्यान सक्रिय असलेला हवेचा कमी दाबाचा आता कमकुवत झाला आहे.

----------

### अजित पवारांच्या आठवणीत

आला आहे. परंतु, अजित पवारांच्या जाण्याने निर्माण झालेली मोठी पोकळी आणि डोंगराएवढे दु:ख समोर असताना, कुठलाही उत्सव साजरा न करण्याचा अत्यंत भावुक निर्णय धनंजय मुंडे यांनी घेतला आहे. आपल्या भावना व्यक्त करताना धनंजय मुंडे यांनी सांगितले की, जीवनात काही क्षण असे असतात की, ते कोणताही उत्सव साजरा करण्यापेक्षा संवेदना आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची जाणीव करून देतात. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने आपण सर्वजण अत्यंत दु:खी आहोत. महाराष्ट्राच्या राजकारणात जनतेसाठी अखंड झटणारा आणि विकासाला दिशा देणारा एक मोठा आधारवड आपण गमावला असून, त्यांच्या आठवणींना विनम्र अभिवादन करत असताना कोणत्याही प्रकारचा उत्सव साजरा करणे माझ्या मनाला मुळीच पटत नाही. अजितदादांच्या निधनाच्या दु:खासोबतच सध्या परळी विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण परिसरात अत्यल्प पर्जन्यमानामुळे शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिक चिंतेच्या छायेत वावरत आहेत. पावसाच्या प्रत्येक सरीकडे आशेने पाहणारा शेतकरी आजही आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. अशा वेदनादायी परिस्थितीत माझा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्याचा विचारही मनाला शिवत नाही. म्हणूनच, १५ जुलै रोजी असणाऱ्या माझ्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचे बॅनर, पोस्टर, होर्डिंग्ज, स्वागत कमानी, फटाक्यांची आतषबाजी, मिरवणुका किंवा उत्सवी कार्यक्रम आयोजित करू नयेत, अशी कळकळीची विनंती त्यांनी आपल्या सर्व कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना, मित्रपरिवाराला आणि जनतेला केली आहे. धनंजय मुंडे म्हणाले की, माझ्यासाठी वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नाही, तर समाजाचे ऋण फेडण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. तुम्ही केलेला प्रत्येक समाजोपयोगी उपक्रम, प्रत्येक मदतीचा हात आणि प्रत्येक सेवाभावाचे कार्य हीच माझ्यासाठी सर्वात मौल्यवान भेट असेल. या समाजसेवेच्या माध्यमातूनच आपण सर्वांनी दिवंगत अजितदादांना खरी आदरांजली अर्पण करूया, असे भावनिक आवाहन त्यांनी केले आहे.

---------

# बीड पोलीस दलात फेरबदल: सहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हयातील पोलीस प्रशासनात महत्त्वाचे प्रशासकीय फेरबदल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळालेल्या अधिकृत आदेशानुसार, सहा पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था तसेच प्रशासकीय निकषांचा विचार करून या बदल्यांचे आदेश १० जुलै २०२६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.**

बदली झालेल्या अधिकाऱ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:पोलीस अधिकाऱ्याचे नावपूर्वीची नेमणूकनवीन नेमणूक १पोनि/उनवणे स्वप्नील कचरूप्रभारी पोस्टे केजप्रभारी आगुशा बीड २पोनि/शेजाळ संतोष शंकरप्रभारी आगुशा बीडप्रभारी, पोउपअ मु बीड ३पोनि/मुदिराज अशोक काशिनाथप्रभारी, पोउपअ मु बीडप्रभारी पोस्टे सायबर बीड ४पोनि/ सुर्यतळ राहुल कामाजीप्रभारी पोस्टे माजलगाव शहरप्रभारी पोस्टे केज ५पोनि/बांगर प्रविणकुमार युवराजप्रभारी पोलीस नियंत्रण कक्ष बीडप्रभारी पोस्टे माजलगाव शहर ६पोनि/केळे निलेश एकनाथरावप्रभारी या सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या नवीन नेमणुकीच्या ठिकाणी त्वरित पदभार स्वीकारून अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक नवनीत कोवत यांनी दिले आहेत. यातील बहुतांश बदल्या या विनंतीवरून करण्यात आल्या आहेत, तर माजलगाव शहर पोलीस ठाण्यासाठी प्रविणकुमार बांगर यांची पदस्थापना करण्यात आली आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १२ जुलै २०२६



## नागपुरात उभारल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन केंद्राची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

नागपूर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या नागपूर येथील परिसरात महाराष्ट्र शासनाच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन सभागृह व सुविधा केंद्राची पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी कामाची गुणवत्ता आणि वेळेत पूर्णत्वावर भर दिला. हे अत्याधुनिक केंद्र पूर्ण झाल्यानंतर नागपूरला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद, कृषी प्रदर्शने, तंत्रज्ञान मेळावे आणि विविध कृषीविषयक कार्यक्रमांचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्यास मोठी चालना मिळणार आहे.

# संत मुक्ताई मार्ग नामकरण सोहळ्याची नोंद सुवर्णाक्षरांनी घेतली जाईल - रविंद्र महाराज

## संत मुक्ताई मार्गाच्या नामकरणाने बीडच्या अध्यात्मिक परंपरेला नवे वैभव मिळाले –आ.विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ मुक्ताईच्या पालखीचे बीड शहरात आगमन होण्याच्या पार्श्वभुमीवर बीड नगर परिषदेच्यावतीने शहरातील सुभाष रोडचे 'संत मुक्ताई मार्ग' असे नामकरण करण्यात आले असून विविध संत-महंत, लोकप्रतिनिधी, व्यापारी, वारकरी, नागरीक आणि भाविकांच्या उपस्थितीत हा नामकरण सोहळा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. संत मुक्ताई नामकरण सोहळा हा इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदला जाईल असे गौरवोद्गार श्री क्षेत्र मुक्ताई संस्थानचे ह.भ.प. रविंद्र महाराज पाटील यांनी काढले तर संत मुक्ताईचे नाव देऊन बीड नगर परिषदेने शहरात अध्यात्माचा वसा आणि वारसा जपला असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री शिवाजीराव पंडित, श्रीक्षेत्र मुक्ताई संस्थानचे ह.भ.प. रविंद्र महाराज पाटील, आ. विजयसिंह पंडित, श्रीक्षेत्र नारायणगडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज, श्रीक्षेत्र भगवानगडाचे विश्वस्त अतुल शास्त्री, ह.भ. प. विशाल महाराज खोले, श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे ह. भ. प. नवनाथ महाराज, ह. भ. प.महंत अमृत दास महाराज जोशी, ह. भ. प. अखंड आनंद गिरी महाराज, ह भ प तुकाराम महाराज भारती, ह. भ. प.हरिदास जोगदंड, ह. भ. प. विनायक महाराज पाटणकर, ह. भ. प. नाना महाराज, कदम ह भ प हरणे महाराज ह. भ. प. पंकज महाराज पाटील पत्रकार संतोष मानूरकर यांची विशेष उपस्थिती होती.

शनिवार, दि.११ जुलै रोजी बीड शहरातील सुभाष रोडचे संत मुक्ताई मार्गाचे नामकरण करण्यात आले. यावेळी संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह. भ. प. रविंद्र पाटील महाराज म्हणाले की, संत मुक्ताई आणि बीडचे अतुट नाते असून त्यांचे आजोबा गोविंद पंत यांची समाधी बीड शहरात आहे. संत मुक्ताई या नावाचे नामकरण करून बीड नगर परिषदेने पुण्यकर्म केले आहे. हा नामकरण सोहळा वारकरी परंपरेचा सन्मान असून या सोहळ्याची इतिहासात सुवर्णाक्षराने नोंद होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी अमृत महाराज जोशी यांनी या नामकरण सोहळ्याचे कौतुक केले. प्रसिध्द किर्तनकार विशाल महाराज खोले यांनी



शिवछत्र परिवाराचे बीड जिल्ह्यात सामाजिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. संत मुक्ताई यांच्या नावाचे नामकरण करून पंडित परिवाराने चांगले कार्य केले आहे. संतांनी दाखविलेल्या सदाचाराच्या मार्गावर समाजाने चालावे असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. श्रीक्षेत्र भगवानगडाचे विश्वस्थ अतुल महाराज शास्त्री यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले असे सांगत आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून होत असलेला हा कार्यक्रम आदर्श आहे. यावेळी श्री क्षेत्र नारायणगडाचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवछत्र परिवार चार पिढ्यापासून सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक क्षेत्रात काम करत आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून बीड नगर परिषदेने आणि सर्व सदस्यांनी संत मुक्ताई नामकरणाचा घेतलेला निर्णय गौरवास्पद आहे. या मार्गावरून जाणाऱ्या आणि या भागातून खरेदी करणाऱ्या सामान्य नागरीकांनाही संतांच्या विचाराची प्रेरणा मिळेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी संत मुक्ताई मार्ग नामकरण सोहळयाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत असताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, लहानपणापासून संत मुक्ताईंची पालखी या रस्त्यावरून जात असताना पाहत आलो आहोत. संत मुक्ताईंची पालखी शहरात आल्यानंतर उत्साहाचे वातावरण शहरात असते. सुभाष रोडला संत मुक्ताई मार्ग नाव देण्याचा विलक्षण आणि प्रेरणादायी योगायोग आहे. बीडला सामाजिक राजकीय, धार्मिक परंपरेचा वारसा लाभला असून तो जपण्याचा कार्य बीड नगर परिषद आणि सर्व पदाधिकारी करत आहेत. शहरातील नागरीक, व्यापारी, संत-महंतांच्या भावना लक्षात घेऊन नगर परिषदेने अध्यात्माचा वसा आणि वारसा जपला आहे. संत मुक्ताईंचे आजोबा गोविंद पंत यांची समाधीही बीड शहरात आहे, या समाधी परिसराचा नगर परिषदेच्या माध्यमातून जिर्णोध्दार करण्याचा संकल्पही यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी केला. यावेळी पत्रकार संतोष मानूरकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बळीराम गवते यांच्यासह बीड नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उपाध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुख पटेल, सभापती शेख निजाम, सभापती बाळासाहेब गुंजाळ, सभापती संजय उढाण, सभापती रणजीत बनसोडे, सभापती जकी सौदागर, उपसभापती शेख बिलाल, नगरसेवक महेश धांडे, प्रमोद शिंदे, मनोज गोडसे, दत्ता जाधव, रामदास सरोदे, अशपाक इनामदार, सादेक अली, जयतुला खान भैय्यासाहेब मोरे, शेख खलील, शामराव पडुळे यांच्यासह विविध संत-महंत, बीड नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक, व्यापारी, वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी, शिवछत्र परिवाराचे कार्यकर्ते तसेच बीड शहरातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात संपन्न झालेला हा नामकरण सोहळा बीडच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासातील एक संस्मरणीय अध्याय ठरला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माधव चाटे यांनी केले तर आभार भागवत तावरे यांनी मानले.

## यशोधरा बुद्ध विहार येथे १२ जुलैला एक दिवसीय 'सत्य अन्वेषण' शिबीराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

यशोधरा बुद्ध विहार ट्रस्ट, फुले नगर, माजलगाव आणि प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी, १२ जुलै २०२६ रोजी एका विशेष 'सत्य अन्वेषण' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. धकाधकीच्या जीवनात मनाला शांती आणि स्थैर्य मिळावे, या उद्देशाने या शिबिराची आखणी करण्यात आली आहे.



आजच्या तणावपूर्ण युगात जीवनाचे अंतिम सत्य आणि मानसिक शांतता शोधण्यासाठी हे शिबीर एक उत्तम माध्यम ठरणार आहे. या शिबिरात सहभागींना ध्यान साधना, शील संवर्धन आणि सदाचार यावर मार्गदर्शन केले जाईल. मानसिक तणाव दूर करणे, एकाग्रता वाढवणे आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, ही या शिबिराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या शिबिराचे मुख्य मार्गदर्शक म्हणून जागतिक विपश्यना आचार्य पू. भदंत विनय रक्षित महाथेरो (नागपूर) उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागींना 'मनाचे शांतीकडून आत्मज्ञानाकडे' असा प्रवास करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

हे शिबीर पूर्णपणे विनामूल्य असून, आयोजकांनी सहभागी होण्यासाठी खालील नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहेवेळसकाळी ९:०० ते संध्याकाळी ५:०० पर्यंतठिकाणयशोधरा बुद्ध विहार, फुले नगर, माजलगाव, जि. बीडवयोमर्यादा२० वर्षे किंवा त्याहून अधिक शिबीरासाठी येतांनापांढरे शुभ्र वस्त्र परिधान करणे अनिवार्य आहे तसेच डायरी आणि पेन असणे आवश्यक आहे. पूर्ण वेळ उपस्थिती बंधनकारक आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरात सहभागी होऊन स्वतःच्या कल्याणासाठी आणि सुखी जीवनासाठी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन येशोधरा बुद्ध विहार ट्रस्ट व संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

नाव नोंदणीसाठी संपर्क: जागा मर्यादित असल्याने इच्छुकांनी लवकरात लवकर आपली नाव नोंदणी करावी. नोंदणीसाठी पुढिल क्रमांकावर संपर्क साधावा बाबासाहेब जाधव ९४०३०४१११२ सुशिलाताई चांदमारे ९७६६९५९३८९ ३ कमलताई डोंगरे ९७६५३७६८०८ ४ राजकुमार सोनवणे ९४०३७८८१०३

# गेवराई तहसिलच्या भष्ट्र कारभाराचा कळस

## १४ वर्षापासुन शेत रस्ता नसल्याने वडगांव ढोक येथिल शेतकऱ्यांच्या शेतजमिनी पडक!

### तहसील कार्यालयच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मिलीभगत!

गेली १४ वर्षापासून प्रल्हाद बारगजे हा शेतकरी तहसील कार्यालत शेत रस्ता साठी उबंरटे झिजवत असताना या शेतकरी रस्ता ची मागणी महसूल प्रशासनाने आज पर्यंत का मान्य केली नाही, हा संशोधनाचा विषय आहे, तहसील कार्यालयच्या या अधिकारी व कर्मचारी फक्त भ्रष्टाचार करण्यात व्यस्त आहेत का अशा प्रश्न सर्वसामान्या भेडसावत आहे.

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वडगांव ढोक येथिल एक शेतकर्याला शेती वहिवाट करण्यासाठी रस्ता नसल्याने तब्बल २०१३ पासून शेत पडक असल्याने शेतकरी मेटाकुटीला आहे, गेली १४ वर्षापासून हा शेतकरी गेवराई तहसिला अर्ज करत उबारंटे झिजवत आहे परंतु या शेतकर्यांची शेत रस्ता काढुन देण्यासाठी आद्यापही वेळ तहसीलदार यांना न मिळाल्याने शेवटी या शेतकर्यांनी कुटुंब सहीत उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे

गेवराई तालुक्यातील वडगांव ढोक येथिल प्रल्हाद निवृती बारगजे यांनी वडगांव ढोक शिवारातील गट क्रमांक २१९ मधील शेतजमीन साठी दि. ०७/१०/२०१३ रोजी वहिवाट रस्ता करुन देण्याची मागणी केली. तात्कालिन तलाठी, व मंडळधिकारी यांनी पंचनामा करुन पुढे काहीच कारवाई झाली नाही या शेतकरी सतत १४ वर्षापासून शेतीसाठी रस्ता मिळावा यासाठी तहसिल कार्यालयाचे उबंरटे झिजवुन बेजार झाला तरी या यंत्रणेला थोडाही पाझर पुठला नाही, १४ वर्षापासून या शेतकर्याच्या शेत जमिनीला रस्ता न दिल्याने हे शेती पडक पडली आहे, विशेष म्हणजे राष्ट्रीय महामार्ग ५१ लगत २०० फुटावर या शेतकर्यांचे शेत आहे. गांव नकाशा वर रस्ता दाखवण्यात आला असतानाही त्या शेतकर्याला रस्ता मिळाला नाही, त्यामुळे या शेतकरी वैतागून दि, ६ जुलै रोजी निवेदन देवुन सात दिवसात रस्ता न मिळाल्यास सहकुटुंब तहसील कार्यालय समोर उपोषण करणार असल्याचे निवेदन तहसीलदार, मुख्यमंत्री, पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलिस ठाणे, तलाठी, ग्रामपंचायत दिले आहे,

## सलग २७ वर्षांपासून रक्तदान करत स्वतःचा वाढदिवस साजरा करणारा अवलिया निलेश कुमार राठौर

बीड । प्रतिनिधी

प्रत्येक जन आपला वाढदिवस हा वेग वेगळ्या प्रकारे साजरा करतात. त्या प्रमाणे निलेशकुमार राठौर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शासकीय रुग्णालय बीड येथे स्वइच्छेने जाऊन रक्तदान करून आपला आपला वाढदिवस साजरा केला. आता पर्यंत त्यांनी २७ वेळेस रक्तदान केले. दरवर्षी ते आपला वाढदिवस रक्तदान करून साजरा करतात.



करू या दान रक्ताचे फेडू या ऋण समाजाचे या उक्ती प्रमाणे ते नेहमी रक्तदान करतात. या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना त्यांनी सांगितले कि, मी एक रक्तदाता आहे आणि मला माणूस असल्याचा अभिमान वाटतो. प्रत्येकाने जरी दर ३ महिन्याला रक्तदान करणे शक्य झाले नाही वर्षातून एकदा तरी आपल्या वाढदिवसाला रक्तदान करावे. नव्या युगाचा नवा नारा वाढदिवसाला रक्तदान करा. रक्त रक्त है कुठल्याही कारखान्यात तयार होत नाही वेळ प्रसंगी मानवाने मानवालाच रक्त द्यावे लागते वेळ प्रसंगीच मनुष्याला रक्ताच्याएक एक थेंबाची किंमत समजते. दाना मध्ये सर्वश्रेष्ठ दान हे रक्ताचे आहे. रक्तदान हे हे जीवदान आहे. त्यांचे हे कार्य पाहून त्यांचा मित्र परिवारही रक्तदान करण्यास प्रवर्त झाला आहे.

बलभीम महाविद्यालय येथे वरिष्ठ अध्यापक असतांना त्यांनी वाणिज्य विभागामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते ज्यामध्ये बऱ्याचश्या विद्यार्थ्यांनी रक्तदान केले होते. या कार्याबद्दल बलभीम महाविद्यालया मार्फत त्यांचा सत्कारही करण्यात आला होता. रक्तदान सारखे चांगले सामाजिक कार्य ते करत असल्यामुळे त्यांचे अभिनंदन व्दा. म. ना. सह. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन साहेब, सोनी साहेब, मुख्य शाखेचे शाखा व्यवस्थापक काळे साहेब, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, जिल्हा शल्यचिकित्सक अंजली नाइकवाडे मॅडम (रक्त संक्रमन अधिकारी), गायकवाड मामा, महाराष्ट्र प्रांतीय राठोड क्षत्रिय समाज (ट्रस्ट) तर्फे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कॅपटण आसाराम राठौर मित्र परिवार यांनी अभिनंदन करून हे कार्य असेच पुढे सुरु ठेवावे या साठी शुभेच्छा दिल्या.

## पंढरपूर जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी सहभागी व्हावे –एकनाथ महाराज लोमटे

गेवराई । प्रतिनिधी

जनसेवा सद्गुरु सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाने मलकापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे आयोजन केले असून या दिंडी सोहळ्यास बहुसंख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे वाहन मलकापूर संस्थांचे मठाधिपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जनसेवानंद सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ जुलै रोजी मलकापूर ते पंढरपूर वारीचे प्रस्थान होणार असून. या पायी दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी पायीदिंडी सोहळा सहभागी व्हावी असे आवाहन एकनाथ महाराज



लोमटे यांनी केले आहे.या दिंडी सोहळ्यात जाणाऱ्या भक्तांसाठी नाष्ट्याची व्यवस्था महादेव शिंदे, नामदेव लोमटे, रामहरी लोमटे ,अरविंद जगदाळे ,गणेश लोमटे ,सौ रंजना अंधारे, नवनाथ वाघज,सनि शिंदे ,सुरज मोरे ,शहाजी चव्हाण ,शिवाजी पाटील, समस्त ग्रामस्थ उपळाई उषा शिंदे व भारत वागज यांनी केले आहे, तर जेवणाची व्यवस्था सुरेश मुळे, रामलिंग मुंडे, संजय पाटील, सोमनाथ मोटे,अर्जुन काकडे ,गणेश ढोरे, मच्छिंद्रनाथ नलावडे ,दत्तात्रय नलावडे, हनुमंत मिलगे ,विनोद मोरे, धनंजय मद्रेवार, दिगंबर देवकर, शिवाजी बर्गे,चंद्रकांत घावटे, चंद्रकांत बारगुळे,संजय शिंदे सोमनाथ फरड ,नामदेव वाघमारे, विलास वाघज ,विश्वनाथ चव्हाण, समाधान आनवते , तर महाप्रसाद संजय वाकडे यांचा होणार आहे हे पायी दिंडी सोहळ्यातील अन्न दाते आहेत हा पायी दिंडी सोहळा दिनांक १८ जुलै शनिवार रोजी मलकापूर येथून या दिंडीचे प्रस्थान होणार आहे तरी भाविक भक्तांनी या पायी दिंडी सोहळ्याचा सहभागी व्हावी असे आवाहन मलकापूर संस्थांचे मठाधिपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

## उमरी फाटा येथे पिक विम्यासाठी आंदोलन शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे – शेतकरी हक्क मोर्चा

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी कर्जमाफीची लढाई जिंकली आहे तरीही शेतकऱ्यांच्या हक्काचा हेक्टरी १७ हजार रुपये पिक विमा देऊ असे घोषणे केले असताना सरकारने व पिक विमा कंपन्यांनी शेतकऱ्याला फसवण्याचे काम केलं आहे. सरकार व पिक विमा कंपनीच्या विरोधात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड पिंपळनेर रोडवरील उमरी फाटा (उमरद खालसा फाटा)पेट्रोल पंपा या ठिकाणी भव्य शेतकरी रस्ता रोको आंदोलन दिनांक १४ जुलै मंगळवार रोजी सकाळी नऊ वाजता आयोजित केले आहे.

तरी शेतकरी पिक विमा करिता आक्रमक झालेले दिसत आहेत शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गावोगावी बैठका घेऊन पिक विमा करिता शेतकऱ्यास जनजागृती करण्यात येत आहे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने भाटसांगवी, राक्षसभुवन, बऱ्हाणपूर ,कुकडगाव,नागापूर खुर्द ,वडगाव गुंडा, ईट या ठिकाणी शेतकरी बैठका घेण्यात आल्या आहेत.जास्तीत जास्त संख्येने शेतकऱ्यांना उपस्थित रहावे असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आले या वेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, सरपंच गोरख डोईफोडे, उपसरपंच अरुण बोगाने, सरपंच राजेंद्र गाडे, दीपक जाधव, राजेंद्र कुटे महाराज, वाणी अण्णा,खाजभाई पठाण, कमलेश बोराडे, दिलीप चादर, राहुल साळुंके, चेअरमन रोहिदास मस्के, उमेश मस्के,

पान ६ वरुन...

### केंद्र सरकारकडील आशांचा

असा प्रश्न ही संघटनेने निवेदनातून उपस्थित केलेला आहे. त्याचबरोबर आरोग्य खात्याकडून अनेक कामे सांगितली जातात.परंतु सहा सहा महिने मोबदला वितरित केला जात नाही. याचाही संघटनेने तीव्र विरोध केलेला असून येणाऱ्या काळात मोबदला नाही तर कामही नाही अशी भूमिका संघटनेने घेतलेली आहे.केंद्र सरकार आरोग्य खात्याचे खाजगीकरण करू पाहत आहे ते सुद्धा हाणून पाडण्यात येईल असा इशारा संघटनेने निवेदनाच्या माध्यमातून दिलेला आहे. सरकारने जर लवकरात लवकर त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाही तर ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी दिल्ली येथे मोठा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कुरे यांनी दिला आहे.या आंदोलनात उर्मिला शेंडगे,उषा औसे, अर्चना पांचाळ,इंदू पाटोळे,कल्याणी साळवे,सलमा भाभी,शकुंतला राठोड,सारिका नवले,वृंदावनी उघडे,सुनीता चव्हाण,राधा काष्टे, ज्योती घडसे,सत्यभामा माने,जयहरी नाईक नवरे,यांच्यासह अनेक आशाताई उपस्थित होत्या.

### युसूफवडगावच्या शेतकरी पुत्राची

देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील माजी.पं.स.सदस्य उमाकांत भुसारी,श्याम रोडगे,विकास जाधव,बापुसाहेब भुसारी, बाबु शिंदे,अनिल शिंदे,सचिन शिंदे,महादेव मोडवे,दिपक नांदे,पत्रकार सचिन उजगरे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी अक्षय शिंदे यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या कार्यातून गावाचे नाव अधिक उंचावेल,असा विश्वास व्यक्त केला.

### वृद्ध , दिव्यांग व निराधार

अद्ययावतीकरण व बायोमेट्रिक प्रमाणीकरणासाठी आवश्यक सहकार्य करणार आहेत. प्रशासनाच्या वतीने सर्व पात्र वृद्ध , दिव्यांग , अंध व निराधार लाभार्थ्यांनी आधार कार्ड , बँक पासबुक , मोबाईल क्रमांक व आवश्यक कागदपत्रांसह दि. १३ व १४ जुलै २०२६ रोजी आयोजित विशेष आधार सेवा शिबिरास उपस्थित राहून या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा , असे संयुक्त आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव तथा तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे .

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईकडून वारकऱ्यांचे स्वागत, फराळ वाटप व रस्ता सुरक्षा जनजागृती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आषाढी वारीच्या पवित्र सोहळ्यानिमित्त उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांनी शासकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचा आदर्श उपक्रम राबविला. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री विनोद साळवी यांच्या तसेच सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री सिद्धेश्वर घुले यांच्या पुढाकाराने शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी लातूरछत्रपती संभाजीनगर महामार्गालगत सम्राट चौक, लोखंडी सावरगाव (लातूर रोड) येथे शेगाव ते पंढरपूर तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतून पायी वारीसाठी निघालेल्या विविध पालख्या व हजारो वारकऱ्यांसाठी फराळ वाटप तसेच रस्ता सुरक्षा जनजागृतीचा व्यापक उपक्रम उत्साहात पार पडला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या सेवेसाठी तसेच त्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून हा उपक्रम राबविला. कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि वाहन प्रतिनिधींनी स्वतः उपस्थित राहून वारकऱ्यांचे स्वागत केले व फराळाचे साहित्य वितरित केले. वारकऱ्यांनीही या सेवाभावी उपक्रमाचे मनापासून स्वागत करत परिवहन विभागाच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले.

यावेळी रस्ता सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा विषय केंद्रस्थानी ठेवण्यात आला. वारकऱ्यांना रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्याचे नियम, वाहतुकीच्या दिशेचे पालन, महामार्ग ओलांडताना घ्यावयाची खबरदारी, रात्रीच्या वेळी परावर्तित (रिफ्लेक्टर) साहित्याचा वापर, वाहनांपासून सुरक्षित अंतर राखणे, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाशी संपर्क साधण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणारी माहितीपत्रके वारकऱ्यांना वाटण्यात आली.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री विनोद साळवी यांनी सांगितले की, परिवहन विभागाचे कार्य केवळ वाहन प्रशासनापुरते मर्यादित नसून नागरिकांमध्ये सुरक्षित वाहतुकीची जाणीव निर्माण करणे आणि समाजोपयोगी उपक्रम राबविणे हे देखील विभागाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. आषाढी वारीसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यात लाखो भाविक सहभागी होत असल्याने प्रत्येक वारकऱ्यापर्यंत रस्ता सुरक्षेचा संदेश पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. सुरक्षित वारी हीच खरी सेवा असून अपघातमुक्त प्रवासासाठी प्रत्येकाने वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमामध्ये मोटार वाहन निरीक्षक श्री प्रशांत वनवे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री ज्ञानेश्वर कांबळे, श्री अक्षय कातळे, श्रीमती ऐश्वर्या कराड, लिपिक श्री सिद्धेश्वर घुले, श्री दिलीप सुरवसे, व इतर सर्व कर्मचारी तसेच श्री रवी मुळे, श्री सुरेश माने, श्री अशोक मोरे, श्री प्रशांत डोरले, श्री पवन लाहोटी, श्री आकाश काळे, श्री मोरे मामा, श्री अकबर शेख, शेरू भाई, श्री अशोक पवार, श्री मुकुंद जोशी, श्री स्वप्निल घाडगे आणि इतर सर्व वाहन प्रतिनिधींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. सदर उपक्रमाला परिसरातील नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शासकीय यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी आणि वाहन प्रतिनिधी यांनी एकत्रितपणे समाजहितासाठी केलेल्या या सेवाभावी कार्यामुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाईची समाजाभिमुख भूमिका अधिक अधोरेखित झाली. सेवाभाव, जनजागृती, रस्ता सुरक्षा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्यात या उपक्रमाला मोठे यश मिळाले.







cmyk


# शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन सुरू; राज्यातील या १२ जिल्ह्यातूनच जाणार महामार्ग

पुणे / प्रतिनिधी

राज्य शासनाच्या पवनार ते पत्रादेवी (नागपूर ते गोवा) या नवीन अलाइन्मेंटनुसार होणाऱ्या शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. याबाबतची अधिसूचना शासनाने नुकतीच जाहीर केली आहे; परंतु या नवीन शक्तिपीठाला बाधित शेतकऱ्यांचा कडाडून विरोध होत असून आगामी काळात शासन विरुद्ध शेतकरी असा तीव्र संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

राज्य शासनाने राज्यातील देवस्थान जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाची घोषणा केली आहे. पूर्वी हा शक्तिपीठ महामार्ग जुन्या अलाइन्मेंटनुसार सातारा जिल्ह्यातून सांगलीच्या आटपाडी तालुक्यात प्रवेश करीत होता. तेथून हा महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातून पुढे जात होता. त्यावेळी तेथील बाधित शेतकऱ्यांनी या शक्तिपीठाला कडाडून विरोध केला होता. त्यामुळे शासनाने ती जुनी अलाइन्मेंट रद्द करून आता नवीन अलाइन्मेंट काढली.

आता हा महामार्ग वर्धा जिल्ह्यातून यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून सावंतवाडी येथील गोवा महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे या



शक्तिपीठसाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादित करण्यात येणार आहे. हा शक्तिपीठ महामार्ग खानापूर तालुक्यातील माहुली गावातून सांगली जिल्ह्यात प्रवेश करीत आहे. त्यामुळे खानापूर, कडेगाव, पलूस व वाळवा तालुक्यातील शेतकरी बाधित होत आहेत. खानापूर तालुक्यातील माहुली, चिखलहोळ, भाग्यनगर, नागेवाडी, घानवड, हिंगणगादे, विटा, ढवळेश्वर व भाळवणी या ९ गावांतील ३९१ गटांतील सुमारे ५३० एकर जमीन संपादित होणार आहे. तसेच कडेगाव तालुक्यातील नेवरी, आंबेगाव, वडियेरायबाग, वांगी, शिरगाव, देवराष्ट्रे व कुंभारगाव या ७ गावांतील अंदाजे १ हजार ३०० एकर जमीन शक्तिपीठसाठी बाधित होत आहे. तर पलूस तालुक्यातील कुंडल व घोगाव या दोन गावांतील ८४२ एकर जमीन संपादित होत आहे. नेवरी व कुंडल-घोगाव येथे शक्तिपीठचे जंक्शन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शक्तिपीठ महामार्गासाठी खानापूर, कडेगाव, पलूस आणि वाळवा तालुक्यातील जमीन मोठ्या प्रमाणात संपादित होणार असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. या शक्तिपीठाला शेतकऱ्यांनी प्रचंड विरोध केला असून आंदोलने, परिपत्रकाची होळी, मोर्चे, रास्ता रोको आंदोलनातून आपला संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. तरीही शासनाने शक्तिपीठ महामार्गाची अधिसूचना काढली असून ती प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे शक्तिपीठसाठी जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

त्यामुळे आगामी काळात शासन व बाधित शेतकरी यांच्यात संघर्ष तीव्र होणार आहे. मुंबईतील पावसाळी अधिवेशनात शक्तिपीठ महामार्ग नवीन अलाइन्मेंटनुसार न करता तो जुन्या अलाइन्मेंटने करावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सभागृहात केली होती; परंतु मुळात या दोन्ही अलाइन्मेंटमुळे शेतकऱ्यांची जमीन जाणार आहे. त्यामुळे जुनी व नवीन या दोन्ही अलाइन्मेंट नकोच आहेत. हा शक्तिपीठ महामार्ग रद्दच करावा, अशी मागणी लोकप्रतिनिधी सभागृहात करीत नसल्याने शेतकरी संतप्त झाले असल्याचे शक्तिपीठ संघर्ष विरोधी समितीकडून सांगण्यात आले आहे.

## गायींना होणारे गंभीर आजार आणि त्यांची लक्षणे

महाराष्ट्रात गायीच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. अर्थात म्हशींच्या संख्येपेक्षा राज्यात गायींची संख्या देखील अधिक आहे. याशिवाय गायीला हिंदू धर्मात पवित्र स्थान असल्याने, आज प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठयात एक तरी गाय आढळते. देशात गायींच्या एकूण ५१ नोंदणीकृत जाती आहेत. याशिवाय अशा सुद्धा काही जाती आहेत, ज्या नोंदणीकृत नाहीत. देशातील एकूण दूध उत्पादनात गायीच्या दुधाचा वाटा ५० टक्के इतका आहे. इतकेच नाही तर देशी गायींवर संशोधन करण्यासाठी उत्तर प्रदेशातील मेरठ या ठिकाणी देशातील सर्वात मोठे कॅटल रिसर्च सेंटर सुरु करण्यात आले आहे.



मेरठ येथे गाय संशोधन केंद्र : गीर, राठी, नागोरी, साहिवाल, बद्री यांसारख्या देशातील देशी गायींच्या अव्वल प्रजाती आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान आणि बिहार या राज्यांमध्ये देशी गायींची संख्या सर्वाधिक आहे. याशिवाय मेरठ येथील गाय संशोधन केंद्रामार्फत देशी गायींची संख्या वाढवण्यासाठी आर्टिफिशल सीमेन टेक्नोलॉजीचा वापर केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर दूध उत्पादकांच्या सोयीसाठी गायींना होणाऱ्या रोगांबाबत सविस्तरपणे माहिती घेतल्यास याचा चांगला फायदा होईल.

घटसर्प/गलघोटू : या आजारामुळे गायींना श्वास घेण्यास त्रास होतो. आणि घशाला सूज येते. या आजारावर प्रतिजैविक आणि इंजेक्शन दिले जाते. तसेच पावसाळ्यापूर्वी या आजाराचे लसीकरण करून घेणे आवश्यक असते. कासदाह आजार : दुधाळ गायींना या आजारामुळे कासेमध्ये समस्या उद्भवते. दुधात गुठळ्या येणे, कासेला सूज येणे ही या आजाराची लक्षणे आहेत. या आजारावर वेगवेगळी औषधे दिली जातात. या आजाराबाबत गायींचे दूध आणि कासेची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असते. फऱ्या रोग : या आजारादरम्यान गायींना १०६-१०७ अंशापर्यंत ताप येतो. गायीच्या पायांना सूज येते. या आजारावर पावसाळ्यापूर्वी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. आजारी गायींना निरोगी जनावरांपासून दूर ठेवणे. दुग्ध ज्वर : या आजारादरम्यान गायीच्या शरीराचे तापमान कमी होते, श्वास घेण्यास त्रास होतो. अशावेळी गायीच्या प्रसूतीनंतर १५ दिवस दूध काढू नये. वासराला पाजावे. या आजारादरम्यान गायीला कॅल्शियमयुक्त आहार आणि पूरक आहार द्यावा. लाळ्या खुरकत रोग : गायींच्या तोंडाला आणि पायाच्या खुरांवर पुरळ येतात. हे पुरळ फुटतात आणि जखमा खोल होतात. अशावेळी तात्काळ पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. याशिवाय या आजारावर पावसाळ्यापूर्वी लसीकरण करून घ्यावे. पावसाळ्यात जनावरांना उघड्यावर चरायला सोडू नये. एंथ्रेक्स रोग : या आजारादरम्यान लघवी आणि शेणात रक्त येते. गायींना खूप ताप येतो. पशुवैद्यकाशी संपर्क साधून परिस्थितीनुसार उपचार करावेत. तसेच या आजारापासून बचाव करण्यासाठी लसीकरण करून घ्यावे. क्षय रोग (टीबी) : या आजारादरम्यान गाय सुस्त होते. तिला कोरडा खोकला आणि नाकातून रक्तस्त्राव होतो. रोगाची लक्षणे दिसू लागताच गायीला दवाखान्यात दाखल करावे. तसेच या आजारादरम्यान गायीच्या चारा पाण्याची विशेष काळजी घ्यावी. ब्रूसेलोसिस : गायीचे पोट डाव्या बाजूने फुगते. तसेच गायीच्या पोटाला डाव्या बाजूने टॅप केल्यावर ड्रम वाजवल्यासारखा आवाज येतो.

## शेतीमध्ये रोपे असणे आवश्यकच

पीक उत्पादनावर परिणाम करणाऱ्या अनेक घटकांमध्ये योग्य रोपसंख्या हा महत्त्वाचा घटक मानला जातो. अनेकदा पेरणी करताना योग्य अंतर न ठेवल्यामुळे किंवा उगवण कमी झाल्यामुळे रोपसंख्या कमी-जास्त होते. याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. त्यामुळे रोपांची संख्या राखण्यासाठी योग्य लागवड तंत्राचा वापर करणे उपयुक्त ठरते. रोपसंख्या म्हणजे एक एकर किंवा एक हेक्टरमध्ये किती रोप/ झाडे आहेत. प्रत्येक पिकाची रोपसंख्या ही त्या पिकाच्या लागवडीतील अंतरानुसार ठरते. प्रत्येक पिकासाठी आदर्श अंतर ठरलेले असते. हे अंतर पिकाच्या पाणी, सूर्यप्रकाश, अन्नद्रव्यांची गरज आणि पिकाच्या आकारानुसार ठरते. जसे कपाशीमध्ये सघन लागवडीत ९० सेंमी बाय १५ सेंमी इतके अंतर ठेवले जाते. या अंतरावर पिकांची लागवड केल्यास एकरी रोपांची संख्या २९६२९ इतकी राहते.

रोपसंख्ये आवश्यकता : प्रत्येक पिकाला वाढीसाठी योग्य प्रमाणात सूर्यप्रकाश, पाणी, अन्नद्रव्ये आणि हवा आवश्यक असते. रोपांची संख्या जास्त झाल्यास ही रोपे एकमेकांशी स्पर्धा करू लागतात. त्यामुळे रोपे उंच वाढतात, पण त्यांची वाढ सशक्त होत नाही. तसेच कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. दुसरीकडे, रोपसंख्या खूप कमी असल्यास जमिनीचा उपयोग पूर्ण क्षमतेने होत नाही. उपलब्ध अन्नद्रव्ये आणि पाण्याचा योग्य वापर होत नाही. परिणामी उत्पादनात घट येते. तज्ज्ञ आणि संशोधन संस्थांनी बियाण्याचे प्रमाण ठरवून दिलेल्या दोन ओळीतील आणि दोन रोपातील अंतरानुसार ठरते. त्यामुळे रोपातील अंतर पाळणे अत्यंत महत्त्वाचे होते. पिकातील योग्य अंतरामुळे रोपसंख्या राखता येते. तज्ज्ञ आणि संशोधक पिकांसाठी खत, कीटकनाशके, बुरशीनाशके यांच्या मात्रांची शिफारस करतात. त्या ठरवून दिलेल्या रोपसंख्येनुसार दिलेल्या असतात.



रोपसंख्या कमी किंवा जास्त होते तेव्हा खत आणि औषधांचा अतिरिक्त वापर होतो किंवा ते अपुरे पडतात. उगवणक्षम बियाण्यांची निवड : योग्य रोपसंख्या मिळवण्यासाठी प्रमाणित आणि चांगली उगवण क्षमता असलेले बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी उगवण चाचणी केल्यास बियाण्यांची गुणवत्ता समजते. त्यानुसारच बियाण्यांचे प्रमाणही ठरवता येते. बीजप्रक्रिया : बुरशीनाशक आणि जैविक बीजप्रक्रिया केल्यामुळं बियाण्यांचे संरक्षण होते आणि उगवण चांगली होते. त्यामुळे पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक असते. शिफारशीनुसार बियाण्याचे प्रमाण : जास्त किंवा कमी बियाणे वापरल्यास रोपसंख्येवर परिणाम होतो. त्यामुळे पिकानुसार शिफारस केलेले बियाण्याचे प्रमाण वापरावे.

योग्य अंतर : दोन ओळीतील आणि दोन रोपांतील अंतर पिकानुसार ठेवणे आवश्यक आहे. यामुळे प्रत्येक रोपाला पुरेशी जागा मिळते. योग्य खोलीवर पेरणी : बियाणे खूप खोल किंवा अगदी उथळ पेरू नये, त्यामुळे बियाण्याची उगवण कमी होऊ शकते. त्यामुळे साधारणपणे पिकानुसार ३ ते ५ सेंमी खोलीवर पेरणी करावी. पेरणीनंतर पाहणी : उगवणीनंतर रोपसंख्या तपासावी. जास्त रोपे झालेल्या ठिकाणी विरळणी करावी. तसेच जिथे रोपे कमी असतील, तिथे लगेच विरळणी केलेली रोपे लावावी. कीड आणि रोग नियंत्रण : सुरुवातीच्या अवस्थेत रोपे नाजूक असतात. अशा अवस्थेत कीड रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे मरू शकतात. त्यामुळे शेतामध्ये नियमित निरीक्षण करून कीडनियंत्रण करावे. त्यासाठी एकात्मिक कीड रोग व्यवस्थापनाचा वापर फायदेशीर ठरतो.

## जनावरांच्या चाऱ्यावर करा युरिया प्रक्रिया; फायदे आणि पद्धत

उन्हाळ्यात पशुंची विशेष काळजी घ्यावी लागते. यात चारा हा महत्त्वाचा घटक आहे. परंतु सध्या महाराष्ट्रात पाणी टंचाई आणि चारा टंचाईमुळे शेतकरी हैराण आहेत. त्यामुळे जनावरांचा चारा कसा पौष्टिक करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जनावरांच्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करणे हा एक चांगला उपाय आहे. यामुळे चाऱ्याची पौष्टिकता तर वाढतेच शिवाय शेतकऱ्यांना खर्च सुद्धा कमी येतो.

चाऱ्यावर युरिया प्रक्रिया का करावी? सध्या पाणी टंचाईमुळे चारा पिकांची लागवड करणे कठीण झाले आहे. बरेच पशुपालक चारा टंचाईमुळे जनावरांच्या आहारात गव्हाचा पेंढा, भात पेंढा, सोयाबीन भुसकट यासारख्या दुय्यम घटकांचा जास्त वापर करतात. निकृष्ट चाऱ्यामध्ये कर्बोदकांच प्रमाण कमी आणि तंतुमय पदार्थ जास्त असतात. तसेच प्रथिने अत्यल्प असतात, त्यामुळे ती पचण्यास कठीण जातात. त्यामुळे आहाराची पौष्टिकता वाढवण्यासाठी युरिया प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

युरिया प्रक्रियेचे फायदे : युरियामध्ये नत्र म्हणजेच नायट्रोजनचे प्रमाण ४६ टक्के असते म्हणून युरिया हा नत्राचा अतिशय सहज व नियमितपणे उपलब्ध होणारा स्रोत आहे. युरीया प्रक्रियेमुळे चाऱ्याची पचनक्षमता वाढते. युरिया प्रक्रिया केलेल्या



चाऱ्याची चव बदलते, नत्राचे प्रमाण वाढते. त्यामुळे जनावरे चारा आवडीने खातात.

युरिया प्रक्रियेची योग्य पद्धत : गव्हाचा पेंढा, भाताचा पेंढा, उसाचे पाचट इ. चा आपण युरिया प्रक्रियेसाठी वापर करू शकतो. प्रति १०० किलो चाऱ्याच्या प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये चांगला मिसळून घ्यावा. त्यानंतर तयार झालेल्या द्रावणात एक किलो मीठ मिसळून एकजीव करावे. सावलीत कोरड्या जमिनीवर पोते आंथरुन कुट्टी केलेला चारा एकसारखा पसरून घ्यावा. साधारणतः ६ इंच इतका चाऱ्याचा थर करावा. पसरलेल्या चाऱ्यावर झारीच्या सहाय्याने तयार केलेले मिश्रण शिंपडावे आणि चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशा प्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. ताडपत्री किंवा प्लॅस्टिक कागदाने चारा हवाबंद करून झाकून टाकावा. २१ दिवस हा चारा हवाबंद ठेवावा, कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसानंतरच हा चारा उघडावा.

चारा जनावरांना केव्हा खायला द्यावा : युरिया प्रक्रियायुक्त चारा जनावरांना खायला देण्यापूर्वी २-३ तास अगोदर चारा मोकळ्या हवेत ठेवावा. जेणेकरून त्यामधील अमोनिया गॅस हवेमध्ये उडून जाईल. राहिलेला चारा त्यानंतर पहिल्यासारखा हवाबंद करून ठेवावा. सुरवातीला जनावरांच्या आहारात चारा थोड्या थोड्या प्रमाणात समाविष्ट करून हळूहळू मात्रा वाढवत न्यावी. ६ महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांमध्ये आणि रवंथ न करणाऱ्या जनावरांना हा चारा देऊ नये.

काळजी आणि सूचना : जनावराच्या आहारात युरियाचा प्रमाणाबाहेर वापर झाला तर युरियाची विषबाधा होण्याची शक्यता असते. यामुळे जनावर दगावण्याची देखील शक्यता असते. जनावरांमध्ये अमोनियाचे प्रमाण १ मिलीग्रॅम प्रति १०० मिली रक्तापेक्षा जास्त झाले तर विषबाधा होते. गायी-म्हशीमध्ये ११६ ग्रॅम आणि मेंढीमध्ये १० ग्रॅमपेक्षा जास्त युरिया खाण्यात आला तर वेगाने जास्तीचा अमोनिया तयार होतो जो विषबाधेसाठी कारणीभूत ठरतो. म्हणून निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करताना ती अतिशय काळजीपूर्वक करावी लागते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्की क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१८९२ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म:)
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)

# सोशल मिडियावर अपप्रचार करुन बदनामी करणाऱ्यांविरुद्ध कारवाई-उपप्रादेशिक परिवहन

## मिडियाच्या माध्यमातून होणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील काही समाजकंटक सोशल मिडियाच्या माध्यमातून चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित करून शासकीय यंत्रणेची बदनामी करणाऱ्या तसेच वाहनधारकांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिला आहे. यासंदर्भात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिकांना अफवांपासून सावध राहण्याचे आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे.महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम १९८८ व त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांनुसार वाहनधारकांनी विहित कालावधीत वाहनांची नोंदणी, फिटनेस, परवाना आदी बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते.

याच पार्श्वभूमीवर दिनांक ३ जुलै, २०२६ रोजी नियमित तपासणीदरम्यान एका मालवाहू ट्रकवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली होती. मात्र या कारवाईनंतर संबंधीत व्यक्तींनी शासकीय वाहन अडवून शासकीय अधिकाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, तसेच जिवे मारण्याची धमकी देण्याचा प्रकार केले. या घटनेप्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता (), २०२३ अंतर्गत संबंधीतावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

यानंतर काही समाजकंटकांकडून सोशल मिडियावर वस्तुस्थितीच्या विपरीत, दिशाभूल करणाऱ्या पोस्ट व संदेश प्रसारित करून उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि त्याच्या अधिकाऱ्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही कार्यालयाने स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या खोट्या माहितीमुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होत असून, शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शासकीय कार्यालय आणि अधिकाऱ्यांची सोशल मिडियावरुन बदनामी करणाऱ्या अशा समाजकंटकाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच काही समाजकंटक वाहनधारकांना केवळ केसेस सोडवून देण्याचे आमिष दाखवून, ''तुमच्या वाहनावर जालना जिल्ह्यात कारवाई होऊ देणार नाही.'', ''आरटीओ कार्यालयातील अधिकाऱ्यांना आम्ही बांधून ठेवले आहे.'', किंवा ''परिवहन विभागाच्या काही अधिकाऱ्यांची बदली लवकरच होणार आहे.'', अशा प्रकारच्या अफवा पसरवत असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा अपप्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन परिवहन प्रशासनाने केले आहे.

परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, वाहनधारकांनी वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करावे. कोणत्याही दलाल, मध्यस्थ किंवा अनधिकृत व्यक्तींच्या भूलथापांना बळी पडू नये. नियमभंग करणाऱ्यांवर कोणताही दबाव किंवा राजकीय हस्तक्षेप न मानता नियमानुसार कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, रस्ता सुरक्षा ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, सुरक्षित, शिस्तबद्ध आणि नियमबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. सोशल मिडियावर कोणत्याही प्रकारची माहिती प्रसारित करण्यापूर्वी तिची सत्यता पडताळून पाहावी आणि अपप्रचार टाळावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

अन्यथा संबंधीतावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.याशिवाय, कोणत्याही अधिकाऱ्यांचे नाव सांगून पैसे मागितले जात असल्यास किंवा कारवाई टाळण्याचे आमिष दाखविले जात असल्यास त्याची तात्काळ माहिती उपप्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा जालना शहर पोलीस प्रशासनाला द्यावी, असेही उपप्रादेशिक परिवहन विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहनधारक, प्रवासी व सर्वसामान्य नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित वाहतूक व्यवस्थेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, सोशल मिडियावरील अफवा आणि अपप्रचारापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

# पोलिसांचा अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर छापा, ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अवैध वाळू माफियांविरुद्ध धडक कारवाई करत मोठी यशस्विता संपादन केली आहे. घनसावंगी तालुक्यातील मौजे गुंज गावात गोदावरी नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे वाळूचा उपसा करून चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मध्यरात्री छापा टाकण्यात आला. या कारवाईत पोलिसांनी एकूण ७१.५१,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १० जुलै २०२६ रोजी मध्यरात्री २:३० वाजेच्या सुमारास पोलिसांना गुप्त बातमीदाराकडूनमाहिती मिळाली की, गुंज गावच्या शिवारात गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध वाळूचे



उत्खनन करून ती हायवा आणि ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये भरून चोरटी विक्री करण्यासाठी नेली जात आहे. या माहितीच्या आधारे अपर पोलीस अधीक्षक , पो.नि.श्री. केतन राठोड, पोलीस हवालदार गोल्डे आणि पोलीस कॉन्स्टेबल पोटे यांच्या संयुक्त पथकाने गुंज बसस्थानकाजवळ सापळा रचला. पोलीस पथकाला पाहताच आरोपी वाहनचालक अंधाराचा फायदा घेऊन आपली वाहने रस्त्यावरच सोडून फरार झाले. पोलिसांनी तात्काळ सर्व वाहने ताब्यात घेतली असून, त्यांची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू आढळून आली. पोलिसांनी पंचसमक्ष साडेसात ब्रास वाळू, दोन हायवा, एक ट्रॅक्टर ट्रॉली, एक कार आणि दोन मोबाईल असा एकूण ७१.५१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फरार झालेल्या अज्ञात वाहनचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३(५) आणि गौण खनिज कायद्यान्वये घनसावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा पोलीस कसून शोध घेत आहेत.मिळाला माल:- ०१ ट्रॅक्टर, ०१ ट्रॉली, ०१ जेसीबी मशीन तसेच ०२ मोबाईल हँडसेट असा एकूण २७१,५१,५००/- किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली.

# कर्जमाफिसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य–जिल्हा उपनिबंधक रोडगे

जालना। प्रतिनिधी

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आता शेतकऱ्यांना आधार कार्ड आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांकाशिवाय कर्जमाफी अथवा प्रोत्साहनपर लाभ कोणत्याही परिस्थितीत दिला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक विष्णु रोडगे यांनी केले आहे.योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेत जमीनधारणेचे क्षेत्र विचारात घेतले जाणार नसून, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून कमाल दोन लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट संबंधित कर्ज खात्यात जमा करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात येणार आहे.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने दिलासा दिला आहे. सन २०२२-२३, सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ या ३ आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही २ वर्षांत पीक कर्ज घेऊन त्याची मुदतीत परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी लिंक करणे आवश्यक आहे. त्यानंतर ॲग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन नोंदणी पूर्ण करावी. नोंदणी झाल्यानंतर मिळणारा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक संबंधित पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करणे अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांकडे हा क्रमांक आधीपासून उपलब्ध आहे, मात्र त्यांनी तो अद्याप बँकेत सादर केलेला नाही, त्यांनीही तो तातडीने बँकेकडे सादर करावा. ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर लाभाची रक्कम खात्यात जमा होणार नसल्याने पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता आवश्यक नोंदणी करून संबंधित बँकेत माहिती सादर करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक विष्णु रोडगे यांनी केले आहे.

# शेतकरी नवनाथ कीर्तने यांचे निधन

पाथर्डी प्रतिनिधी



मालेवाडी येथील शेतकरी नवनाथ तुकाराम कीर्तने यांचे शुक्रवारी सायंकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले ते ७५ वर्षाचे होते नवनाथ तुकाराम कीर्तने हे वारकरी भक्त असून त्यांनी कायम पांडुरंगाची भक्ती केली त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंड असा मोठा परिवार आहे जय जवान जय किसान कृषी सेवा केंद्राचे संचालक व मुंडे समर्थक असलेले संजय किर्तने यांचे ते वडील होते नवनाथ तुकाराम कीर्तने यांच्या निधनाबद्दल राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी कीर्तने कुटुंबाबद्दल शोक व्यक्त केला आहे

# बोअरची वायर चोरल्याच्या संशयावरुन तीन अल्पवयीनांना खांबाला बांधून बेदम मारहाण

लातूर

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील खरोळा गावात माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. शेतातील बोअरवेलची इलेक्ट्रिक वायर चोरी केल्याच्या संशयावरून तीन अल्पवयीन मुलांना खांबाला बांधून अमानुषपणे बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संतापाची लाट उसळली असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खरोळा गावातील एका शेतातील बोअरवेलची इलेक्ट्रिक वायर चोरीला गेल्याची घटना घडली होती. या चोरीचा संशय गावातील



तीन अल्पवयीन मुलांवर घेण्यात आला. मात्र, पोलिसांकडे तक्रार करून कायदेशीर मार्ग अवलंबण्याऐवजी काही व्यक्तींनी थेट कायदा हातात घेतला.

संशयित ठरवण्यात आलेल्या तिन्ही मुलांना पकडून शेतातील एका खांबाला दोरीने घट्ट बांधण्यात आले. त्यानंतर काठी आणि हाताने त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये ही मुले वेदनेने ओरडत, गयावया करत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, मारहाण करणाऱ्यांनी त्यांच्यावर कोणतीही दया न दाखवता मारहाण सुरूच ठेवल्याचे दिसत आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने मोबाईलमध्ये चित्रित केला. तो सोशल मीडियावर व्हायरल होताच नागरिकांनी संताप व्यक्त केला. अल्पवयीन मुलांशी अशा प्रकारची अमानुष वागणूक देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

घटनेची माहिती मिळताच रेणापूर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिसांनी या प्रकरणात दोन्ही बाजूंनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. मुलांना खांबाला बांधून मारहाण करणाऱ्या संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तर दुसरीकडे, शेतातील बोअरवेलची वायर चोरी झाल्याच्या तक्रारीवरून स्वतंत्र चोरीचाही गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्या प्रकरणाचाही तपास सुरू आहे. या घटनेमुळे कायदा हातात घेण्याच्या वाढत्या प्रवृत्तीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

चोरीचा संशय असला तरी कोणालाही शिक्षा करण्याचा अधिकार सामान्य नागरिकांना नसून, अशा प्रकारे अल्पवयीन मुलांना सार्वजनिक ठिकाणी बांधून मारहाण करणे हा गंभीर आणि कायद्याने शिक्षापात्र गुन्हा आहे.

व्हायरल व्हिडिओच्या आधारे पोलिसांकडून संबंधितांची ओळख पटवून पुढील कारवाई केली जात असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# दोन दिवसांपूर्वी ३ जिल्ह्यांत धक्के बसल्यानंतर हिंगोलीत पुन्हा ३.५ रिश्टर स्केलचा भूकंप

हिंगोली। प्रतिनिधी

मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा जोरदार हादरा बसला आहे. आज सकाळी ११ वाजून २६ मिनिटांच्या सुमारास हिंगोली शहरासह वसमत आणि औंढा नागनाथ परिसरातील जमीन अचानक हादरली. नॅशनल सिस्मॉलॉजी सेंटरच्या (भूमापक केंद्र) माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे. अचानक घरांचे पत्रे आणि घरातील भांडी वाजू लागल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि अनेकांनी सुरक्षेसाठी थेट रस्त्यावर धाव घेतली. सुदैवाने यात अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळच्या सुमारास नागरिक आपापल्या दैनंदिन कामात व्यस्त असताना, ११ वाजून २६ मिनिटांनी जमिनीतून गूढ आवाज आला आणि जोरदार हादरा बसला. हिंगोली शहरासह शेजारील वसमत आणि औंढा नागनाथ तालुक्याला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला. भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल इतकी असल्याने हा धक्का बऱ्याच स्पष्टपणे जाणवला.

या भूकंपामुळे सुदैवाने अद्याप कोणत्याही प्रकारच्या जीवितहानी किंवा मोठ्या वित्तहानीची नोंद झालेली नाही. मात्र, भूकंपाचे धक्के वारंवार जाणवत असल्याने प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग सतर्क झाला असून, नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दोन दिवसांपूर्वी मराठवाड्यातील ३ जिल्ह्यांमध्ये मध्यरात्री भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. हिंगोली, परभणी आणि नांदेड या तिन्ही जिल्ह्यांमधील अनेक भागांत मध्यरात्री १ वाजून ३७ मिनिटांनी भूकंपाचे हे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. हिंगोलीतील शिरळी परिसरात ४.६ रिश्टर स्केलची नोंद झाली. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे नागरिकांनी रात्र जागून काढली. नांदेड शहरातील तरोडा नाका, मालेगाव, कावरानगर, निळा रोड या भागातील नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवले. हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षापासून भूकंपाची मालिकाच सुरु आहे. सतत होणाऱ्या भूकंपामुळे नागरीक भयभित झाले आहेत. गुरुवारी ता. ९ पहाटे १ वाजून ३७ मिनिटांनी ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला असून शिरली (ता. वसमत) हे भूकंपाचे केंद्रबिंदू असून खोली १० किलोमिटर आहे. त्यानंतर दुसरा धक्का २.१५ मिनिटांनी ३.६ रिश्टर स्केल, २ वाजून १७ मिनिटांनी ३.९ रिश्टर स्केल, तर ३ वाजून २३ मिनिटांनी ४.१ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली असूनत त्याचे केंद्रबिंदू काकडदाभा (औंढा नागनाथ) असल्याचे स्पष्ट झाले आहे. या भूकंपाचे धक्के वसमत, हिंगोली, कळमनुरी व औंढा नागनाथ तालुक्यात अधिक तिव्रतेने जाणवले आहे. ग्रामीण भागातील गावकऱ्यांनी रात्र जागून काढली आहे. आमदरी येथे एका घराची भिंत कोसळली असून १० ते १२ घरांना तडे गेले आहेत. तसेच पांगरा शिंदे गावात ५० ते ६० घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत. या भागात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये. आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यास प्रशासन सज्ज असून स्थानिक यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**टीसी हरवला आहे**

रोहन रमाकांत नवले रा. बंगालिपिंपळा या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टीसी. गेवराई ते बंगालिपिंपळा प्रवासादरम्यान हरवला आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा .

**संपर्क**
**८९९९३९४६७८**

**टीसी हरवला आहे**

कुमारी प्रांजल चंद्रकांत कारके रा.अंबड ता. अंबड जिल्हा जालना हिची १२ वी पासची ए एम डी कॉलेजची विज्ञान शाखेची टी.सी. अंबड - जालना बसमध्ये प्रवासा दरम्यान हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**मो. ९९२१६८४५८६**

**टीसी हरवला आहे**

आशिष दिनेश काळुसे या नावाचा १२ वी पास टी सी पाटोदा ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा.

संपर्क.
**७२७६३२४४९४**

# संभाजीनगरात तथाकथित डॉनच्या बंगल्यावर गुन्हे शाखेचा छापा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरात ९० च्या दशकात आपली मोठी दहशत निर्माण करणाऱ्या आणि गेल्याच महिन्यात निधन झालेल्या तथाकथित 'डॉन' बाबा फरजान याच्या मिटमिटा येथील आलिशान बंगल्यावर गुन्हे शाखेने भल्या पहाटे धाडसी छापा टाकला. अत्यंत गोपनीयतेने करण्यात आलेली ही कारवाई तब्बल २१ तास चालली. या छापासत्रात पोलिसांच्या हाती मोठे घबाड लागले असून, दोन खोल्यांमध्ये सापडलेली कोट्यवधींची रोकड मोजण्यासाठी पोलिसांना ५ काउंटिंग मशिन्स मागवाव्या लागल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, मिटमिटा आणि सिटी चौक परिसरात एकेकाळी मोठा दबदबा असलेल्या बाबा फरजान याचे महिन्याभरापूर्वीच निधन झाले होते. त्यानंतर पोलिसांनी या कारवाईचे नियोजन अत्यंत गुप्त ठेवले होते. छापा टाकण्यापूर्वी पोलिसांनी डॉनच्या दोन अत्यंत विश्वासू कर्मचाऱ्यांना आधीच ताब्यात घेऊन चौकशी केली होती. त्यानंतर शुक्रवारी भल्या पहाटे ४ वाजेच्या सुमारास शहर पोलिस, गुन्हे शाखा, आर्थिक गुन्हे शाखा आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या फौजेने पडेगाव-मिटमिटा परिसरातील सुमारे एक एकर परिसरात पसरलेल्या या आलिशान बंगल्याला वेढा घातला. २१ तासांच्या झडतीत काय काय आढळले? ५ कोटींची बेहिशोबी रोकड : ५०० रुपयांच्या नोटांची बंडले मोजण्यासाठी ५ मशिन्स मागवण्यात आल्या होत्या. २९ लाखांचे दागिने : २१ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि ८ लाख रुपयांची चांदी जप्त. घातक शस्त्रास्त्रांचा साठा : ४ रायफल, तब्बल ५०० जिवंत काडतुसे, तलवारी आणि तीक्ष्ण चाकू हस्तगत. पहाटे सुरू झालेले हे छापासत्र मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास म्हणजेच तब्बल २१ तासांनी संपले. बंगल्यातील दोन गुप्त खोल्यांमध्ये ही बेहिशोबी रोकड, दागिने आणि घातक शस्त्रे लपवून ठेवण्यात आली होती. पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनेही या मालमत्तेचा सखोल तपास सुरू केला असून, या सर्व घडामोडींचा अधिकृत तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. या संदर्भात पोलिस प्रशासन आज दुपारी पत्रकार परिषद घेणार असून, या 'मेगा ऑपरेशन'ची संपूर्ण 'इनसाईड स्टोरी' समोर आणणार आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र


# माजलगाव नगर परिषदेत बनावट कागदपत्रांचा गंभीर आरोप

## दोषींवर कारवाई न झाल्यास २० जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा; पीटीआर, मालमत्ता,रजिस्टरमध्ये फेरफार; शासकीय निधी अपहारप्रकरणी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगर परिषदेतील पीटीआर (मालमत्ता रजिस्टर) मध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे कथित फेरफार करून शासकीय निधीचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप करत पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात शिवहार शेटे व गौरीशंकर (महेश) औटी यांच्यावरही आरोप करण्यात आल्याचा उल्लेख करण्यात आला असून, संबंधित सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा दि. २० जुलै २०२६ पासून नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सन २०२१ मध्ये नगर परिषदेतील काही कर्मचारी व अधिकाऱ्यांविरोधात बनावट कागदपत्रे तयार करणे, अधिकाऱ्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करणे आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी गुन्हे दाखल झाले होते. मात्र, इतका कालावधी उलटूनही संबंधितांवर कठोर कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे गैरप्रकार करणाऱ्यांना अभय मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



तक्रारीनुसार, वार्ड क्रमांक २९ मधील पीटीआर मालमत्ता नोंदींमध्ये वेगवेगळ्या हस्ताक्षरांचा वापर करून कथित फेरफार करण्यात आला. तसेच संबंधित रकमेचा नगर परिषद खात्यात भरणा न करता शासकीय निधीचा अपहार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात शिवहार शेटे व गौरीशंकर (महेश) औटी यांच्यावरही विविध आरोप करण्यात आले असून, या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यापूर्वीही या प्रकरणाशी संबंधित काही अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झाल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला असून, संबंधित कर्मचारी, अधिकारी तसेच ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत अशा सर्व व्यक्तींची उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती राज्यपाल, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, नगर परिषद संचालनालय, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगराध्यक्ष, शहर पोलीस ठाणे तसेच स्थानिक आमदार यांना पाठविण्यात आल्या आहेत.

पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे आणि विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ भाऊ ससाणे यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन सादर करण्यात आले असून, प्रशासनाने तातडीने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई न केल्यास २० जुलैपासून आमरण उपोषणासह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## कायम बंद जिओ मार्टमुळे ग्राहक संतप्त! सेवा नव्हे, तर नागरिकांची थट्टाच; वरिष्ठांनी तातडीने कारवाई करावी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील जिओ मार्ट (जिओ सेवा केंद्र) ग्राहकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात ते अनेकदा कायम बंदच राहत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मोबाईल, सिमकार्ड, ई-केवायसी, नेटवर्क समस्या, रिचार्ज, सेवा बंद होणे, सिम बदलणे अशा विविध अडचणी सोडवण्यासाठी तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या अपेक्षेने या सेवा केंद्राकडे धाव घेतात. मात्र, केंद्रावर कुलूपच दिसत असल्याने ग्राहकांची अक्षरशः फरफट होत आहे.

आष्टी तालुक्यातील अनेक गावांमधून नागरिक वेळ, पैसा आणि श्रम खर्च करून शहरात येतात. परंतु जिओ मार्ट बंद असल्याने त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागते. त्यामुळे दिवसभराचा वेळ वाया जात असून आर्थिक फटकाही बसत आहे. डिजिटल युगात प्रत्येक व्यवहार ऑनलाइन झाल्याने मोबाईल सेवा ही आता चैनीची नव्हे, तर अत्यावश्यक गरज बनली आहे. अशा परिस्थितीत सेवा केंद्र बंद ठेवणे म्हणजे ग्राहकांच्या मूलभूत गरजांशी खेळ करण्यासारखे असल्याची तीव्र भावना नागरिक व्यक्त करत आहेत. ग्राहकांची सेवा करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी आपली जबाबदारी झटकत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. लाखो ग्राहकांकडून महसूल मिळविणाऱ्या कंपनीने ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याऐवजी त्यांची पायपीट सुरू ठेवणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. आष्टीतील जिओ मार्ट नियमित वेळेत सुरू ठेवण्यात यावे, सेवा केंद्रावर कर्मचारी कायम उपलब्ध असावेत आणि वारंवार केंद्र बंद ठेवणाऱ्या जबाबदार कर्मचाऱ्यांवर तातडीने शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

अन्यथा ग्राहकांचा उद्रेक अटळ असून, संबंधित विभागाच्या निष्काळजीपणाविरोधात तीव्र लोकआंदोलन उभे राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिओ प्रशासनाची राहील, असा इशाराही संतप्त नागरिकांनी दिला आहे.




## युसूफवडगावच्या शेतकरी पुत्राची एसआरपीएफमध्ये निवड; अक्षय शिंदे व आई-वडिलांचा जाहीर सत्कार

युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील अक्षय बन्सी शिंदे यांची राज्य राखीव पोलीस दल (डठझऋ) मध्ये निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा तसेच त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला.



अक्षय शिंदे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर डठझऋ गट क्र.१९ मध्ये स्थान मिळवून गावाचे नाव उज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील युवकांना नवी प्रेरणा मिळाली असून, शेतकरी कुटुंबातूनही मोठे यश संपादन करता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी अक्षय शिंदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या यशामागे आई-वडिलांचे कष्ट, त्याग आणि प्रोत्साहन महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांचाही शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ ◀◀ पान ३ वर

## कोरबू गल्लीतील अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पीटीआर वाटप करा : सय्यद एजाज

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील कोरबू गल्ली परिसरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या गरीब व गरजू अतिक्रमण धारकांचे तातडीने सर्वेक्षण करून पात्र कुटुंबांना पी.टी.आर. (झीर्शिीं ढरु ठशसळीींशी) वाटप करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी गेवराई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, कोरबू गल्ली परिसरात अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहत असून त्यांच्या घरांची नोंद अधिकृत पी.टी.आर.मध्ये नसल्यामुळे त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत आहेत. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना) अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी जागेचा अधिकृत पुरावा म्हणून पी.टी.आर. आवश्यक असल्याने अनेक पात्र कुटुंबे घरकुलाच्या लाभापासून वंचित राहत आहेत. सध्या या परिसरातील अनेक नागरिक कच्च्या व जीर्ण घरांमध्ये वास्तव्यास असून पावसाळ्यासह इतर ऋतूंमध्ये त्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने या भागातील सर्व अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करावी आणि नियमानुसार त्यांना पी.टी.आर. वाटप करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी सय्यद एजाज यांनी केली आहे. घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन या विषयाला नगरपरिषद प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे, जेणेकरून गरीब व गरजू कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घरकुल मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## केंद्र सरकारकडील आशांचा एक वर्षापासून थकलेला मोबदला त्वरित वितरित करा

माजलगाव । प्रतिनिधी

केंद्र सरकारने सन २०२५ मध्ये आशा यांच्या मोबदल्यात एक हजार पाचशे रुपये वाढ केलेली होती. तो वाढीव मोबदला अद्याप पर्यंत केंद्र सरकारने राज्य सरकारला वितरित केलेला नाही.त्यामुळे ते पैसे आशांच्या खात्यावर अजून पडलेली नाहीत. म्हणून केंद्र सरकार कडील थकीत मोबदल्यासाठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय माजलगाव येथे तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात आली.




याबाबत दिलेल्या निवेदनात संघटनेने अनेक मागण्या केलेले आहेत. त्यात प्रामुख्याने केंद्र सरकारने वाढवलेला १५०० रुपये मोबदला तसेच केंद्र सरकारने एन एच एम या योजनेला फक्त सहा महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे.त्यामुळे ही योजना बंद करण्याचा तर शासन विचार करीत नाही ना ◀◀ पान ३ वर

## पदाधिकारी मुख्याधिकाऱ्यांचे संगणमत : १२० मीटरच्या रस्त्याचा खर्च तब्बल एक कोटी वीस लाख

बीड । प्रतिनिधी

जगात ज्या गोष्टी अशक्य आहेत अशा गोष्टी फक्त आणि फक्त बीडमध्येच घडतात किंवा पाहायला मिळतात बीड नगर परिषदेच्या वतीने सध्या शहरात रस्ते आणि नाल्यांची कामे सुरू आहेत मात्र अवघ्या १२० मीटर रस्त्यासाठी तब्बल एक कोटी २० लाख रुपयांचा खर्च करण्यात येत आहे नगरपालिका आणि गुत्तेदार सिमेंट काँक्रीट चा रोड बनवत आहेत की सोन्याचा असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष बाब म्हणजे ज्या गुत्तेदाराने शहरातील ३० रस्त्यांची कामे घेतली आहेत त्याच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने अनेक कामे दुसऱ्या एजन्सीला बेकायदेशीरपणे वाटप करण्यात आली आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्यामुळे बीड शहरातील ३० रस्त्यांना २२ कोटी पेक्षा अधिक निधी मंजूर झाला. ही सर्व कामे आणि त्याचे टेंडर नगरपालिकेने प्रकाशित केल्यानंतर केवळ एकाच एजन्सीला काम द्यायचे म्हणून नगराध्यक्षांसहित सर्व पदाधिकारी मुख्याधिकारी यांनी संगणमत करून सिताई कन्स्ट्रक्शन या एजन्सीला सर्व कामाच्या वर्क ऑर्डर दिल्या. या वर्क ऑर्डर देताना संबंधित एजन्सीकडे पुरेसे मनुष्यबळ आहे की नाही पुरेशी यंत्रणा आहे की नाही या कोणत्याच गोष्टीचा विचार केला गेला नाही सगळ्यांनी मिळून आपले आपले हित पाहून या एजन्सीला एक गठ्ठा ३० कामे दिली जे चुकीचे आणि बेकायदेशीर आहे.

एप्रिल २०२६ मध्ये या सर्व कामांच्या वर्क ऑर्डर झाल्यानंतर तातडीने काम सुरू होणे अपेक्षित होते मात्र दोन-चार रस्त्यांची कामे सोडता इतर कामे अद्याप सुरू झालेली नाहीत पावसाळा सुरू असताना जी कामे सुरू केली आहेत तिचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. जिल्हा परिषद बीड ते बशीर्गंध हा अवघ्या १२० मीटरचा रस्ता तयार करण्यासाठी नगरपालिकेने या गुप्तदाराला तब्बल एक कोटी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे म्हणजे एका मीटरवर तब्बल लाख ते सव्वा लाख रुपये खर्च होणार की काय आणि त्यातून सिमेंट काँक्रीट ऐवजी सोन्याचा तर रस्ता तयार केला जाणार नाही ना अशी चर्चा सुरू झाली आहे.

## सहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश काढले आहेत. प्रशासकीय तसेच कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीकोनातून बदलीने रिक्तपदे भरण्याच्या प्रक्रियेनुसार हे आदेश काढण्यात आले आहेत.

केज पोलीस ठाण्याचे पो. नि.स्वप्नील उनवणे यांची बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी माजलगाव शहरचे पो.नि. राहुल सुर्यतळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सध्या बीड येथील पोलीस नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पो.नि. प्रविणकुमार बांगर यांची माजलगाव शहर पोलीस ठाणे प्रभारी म्हणून पदस्थापना करण्यात आली आहे. बीड येथील सायबर पोलीस ठाण्याचे पो.नि.निलेश केळे यांची पेठ बीड पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी बदली करण्यात आली आहे तर पोलीस उपअधिक्षक मुख्यालय येथील पो.नि. अशोक मुदीराज यांच्यावर बीडच्या सायबर पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी संतोष शेजाळ यांची पोलीस उपअधिक्षक मुख्यालय प्रभारी पदी बदली करण्यात आली आहे. संबंधित सर्व सहा पोलीस निरीक्षकांना बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

## वृद्ध , दिव्यांग व निराधार लाभार्थ्यांसाठी १३ व १४ जुलै रोजी विशेष आधार सेवा शिबिर ; लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या नियंत्रणाखाली तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या देखरेखीखाली बीड तहसील कार्यालयामार्फत सामाजिक सुरक्षा योजनांतील वृद्ध , दिव्यांग , अंध व निराधार लाभार्थ्यांसाठी दि. १३ व १४ जुलै २०२६ रोजी जुनी पंचायत समिती परिसरातील संजय गांधी विभाग , तहसील कार्यालय , बीड येथे विशेष आधार सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिरामध्ये आधार पडताळणी , आधार अद्ययावतीकरण तसेच आधाराशी संबंधित विविध तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली .

शासनाच्या संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना , इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना , दिव्यांग पेन्शन योजना तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजनांचे अनुदान व मानधन थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते . यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत असणे , बायोमेट्रिक माहिती अचूक असणे तसेच आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे अत्यावश्यक आहे.

या विशेष शिबिरात आधार प्रमाणीकरण न होणे , डोळ्यांचे आयरीस स्कॅन अयशस्वी होणे , बोटांचे ठसे जुळत नसणे , बायोमेट्रिक पडताळणीतील अडचणी , आधार कार्डातील माहिती दुरुस्ती , आधार अद्ययावतीकरण , मोबाईल क्रमांक नोंदणी , तसेच आधाराशी



संबंधित विविध तांत्रिक समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे . विशेषतः वयोमानामुळे अथवा शारीरिक अडचणींमुळे बायोमेट्रिक पडताळणी होत नसलेल्या वृद्ध , अंध व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केले आहे की , ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण होत नाही , बोटांचे ठसे उमटत नाहीत , डोळ्यांचे स्कॅन होत नाहीत , आधार कार्डामध्ये दुरुस्ती आवश्यक आहे किंवा आधाराशी संबंधित कोणतीही तांत्रिक अडचण आहे , अशा सर्व लाभार्थ्यांनी दि. १३ व १४ जुलै २०२६ रोजी सकाळी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा . आधार अद्ययावत झाल्यास शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ नियमित व विनाअडथळा मिळण्यास मदत होणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ एकाही पात्र लाभार्थ्यापासून वंचित राहू नये , यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून शिबिर यशस्वी करावे , अशा सूचना दिल्या आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी लाभार्थ्यांच्या अडचणी तातडीने सोडविण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश दिले असून , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सर्व पात्र लाभार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेऊन आधार अद्ययावत करून घ्यावा , असे आवाहन केले आहे .

शिबिराच्या नियोजनासाठी नायब तहसीलदार अण्णा वंजारे , नायब तहसीलदार संभाजी थोटे , हेमलता परचाके , वैशाली बहिरवाळ , महेंद्र राऊत हे समन्वयाची जबाबदारी पार पाडत असून , आधार केंद्राचे सुपरवायझर राहुल जोगदंड व ऑपरेटर आदेश शिंदे हे शिबिरात लाभार्थ्यांना आधार नोंदणी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26